## प्रकरण सहावे

# तात्यासाहेब कोरे यांचे संकल्प व वारसा

❋ प्रकरण सहावे ❋

# तात्यासाहेब कोरे यांचे संकल्प व वारसा

**प्रस्तावना :-**

प्रत्येक मनुष्याने आपल्या जीवनात काही संकल्प केलेले असतात. त्या संकल्पापैकी सर्व पूर्ण होतात असे नाही. आणि जे मनात आणतो ते सर्व पूर्ण झाले तर ते जीवन कसले. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात चढ-उतार असतात. हें चढउतार पार करत जीवन जगावयाचे असते. जगातील महान पुरूषांच्या जीवन चरित्राकडे पाहिल्यास त्यांनी कोणतेतरी संकल्प केलेले आढळून येतात, स्वप्ने पाहिलेली असतात. आयुष्यभर भरपूर कार्य केल्यानंतर त्या संकल्पनापैकी काही अस्तित्त्वात येतात; तर काही अपूर्ण राहिलेली असतात. आयुष्याच्या अखेरीस ती पूर्ण करण्याची धडपड असते. पण मनुष्याचे जीवन हे मर्यादित असल्यामुळे सर्व संकल्प पूर्ण होतीलच याची खात्री देता येत नाही. पण जीवनाला निश्चित दिशा देण्यासाठी काही संकल्प करणे गरजेचे आहे. स्वप्ने पाहणे हा मनुष्याच्या स्थायी स्वभाव आहे, पण स्वप्ने ही अवास्तव असू नयेत. ती साकार करण्यासाठी कष्ठ, मेहनत करण्याची जिद्द असली पाहिजे.

तात्यासाहेब कोरे यांनी वारणा परिसरातील ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. १९५४ साली वारणा साखर कारखान्याच्या उभारणीसाठी तात्या घरच्या जबाबदारीतून मुक्त झाले ते शेवटपर्यंत. ते कोरे कुटुंबाचे न राहता संपूर्ण वारणा परिसराचे कुटुंबप्रमुख झाले. एकदा त्यांनी हा संपूर्ण भाग आपला आहे, असे मानले तेंव्हापासून प्रत्येक गोष्ट करत असताना आपल्या भागाचा विकास कसा होईल एवढेच त्यांनी पाहिले. यासाठी त्यांनी अनेक संकल्प केले; ते पूर्ण करण्यासाठी अहोरात्र कष्ट केले. प्रत्येक संकल्प केवळ पूर्ण केला नाही, तर तो

आदर्श संकल्प ठरावा यासाठी विशेष प्रयत्न केले. सुरूवातीच्या काळात त्यांनी आपली शेती सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर सार्वजनीक जीवनात कोडोलीची सेवा सोसायटी केवळ नाममात्र शिल्लक होती, पण आपल्या कुशल नेतृत्त्वामुळे ती आदर्श केली, तिचे नाव संपूर्ण जिल्ह्यात गाजू लागले. कोडोलीचे नगराध्यक्ष पद भूषविताना अनेक अनुभव झाले, तसेच कोडोली हायस्कूल उभारणीसाठी मोठे प्रयत्न करावे लागले पण समाजकारण, राजकारण भाऊबंधकी इत्यादीचा अनुभव तात्यांना आला, घरातील सर्वात मोठे असल्यामुळे घरची जबाबदारीही लवकरच पडली होती, कमी वयात अनेक चांगले-वाईट अनुभव आले होते. मनुष्याचे जीवन हे सरळमार्ग नसून त्याला अनेक वळणे असतात, ती वळणे बाजूला सारून जीवन जगावे लागते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारे तयार झाले होते. जीवनात कष्ट हे फार महत्त्वाचे आहे. कष्टाशिवाय कोणतीच गोष्ट मिळत नाही, कष्टाला पर्याय नाही. हे कोरे कुटुंबियाचे खास वैशिष्ट्य होते. हेच संस्कार तात्यांच्या बाल मनावर झाले, त्यांचा फायदा पुढील जीवनात तात्यांना झाला.

स्वातंत्र्य चळवळीमध्ये काम करत असताना म. गांधी, पं. नेहरू, सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल यासारख्या नेत्यांचे विचार ऐकायला मिळाले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वतंत्र चळवळीमध्ये प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी मिळाली. छत्रपती शाहू यांच्या संस्थानच्या कार्यक्षेत्रात वाढले, त्यामुळे त्यांच्या कार्याचा ठसा त्यांच्या मनावर बिंबला, तसेच रत्नाप्पा कुंभार, भाई माधवराव बागल, यशवंतराव चव्हाण इ. मित्रांच्या समवेत काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे जीवनाला एक निश्चित दिशा प्राप्त झाली. कोणतेही सार्वजनीक कार्य करण्यासाठी सामुदायीक शक्ती फार महत्त्वाची आहे. संपूर्ण समाज एकत्र आला तर कोणतेही अवघड काम करणे शक्य होते. हे विचार तात्यासाहेबांच्या जीवनात मार्गदर्शक ठरले. देशाला स्वातंत्र्य मिळाले

होते. स्वातंत्र्य चळवळीमध्ये काम केलेले युवक देशाचा कारभार करणारे होते. परकीय सत्तेने या देशाची लूट केली होती. अशा परिस्थितीत देश सुधारावयाचा असेल तर प्रथम शेती उद्योग सुधारला पाहिजे. व शेतकऱ्यांच्या मालाला निश्चित दर मिळाला पाहिजे. अशा लोकांच्या अपेक्षा होत्या. रात्रंदिवस कष्ट करून शेतकऱ्याने निर्माण केलेली पिके कवडीमोल किंमतीने विकली तर शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती कशी सुधारणार ? हा प्रश्न होताच. आपल्या प. महाराष्ट्रात तर ऊस पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. सर्व ऊस गुळाला पाठवला जात होता. १९५१ साली गुळाच्या धंद्याला न भूतो न भविष्यति अशी हलकी किंमत मिळाली. गुळाला किंमत नसल्याने गुऱ्हाळ चालवणे अवघड झाले. पीक तर उभे मग ह्या पीकाचे काय करायचे असा मोठा प्रश्न होता ? सर्व मार्ग बंद झाले त्या पिकावर शेतकऱ्यानी किती संकल्प केले होते. शेवटी दुःखी व कष्टी अंत:करणाने बऱ्याच शेतकऱ्यांनी ऊस अक्षरश: पेटवून दिला. तात्यांच्या डाग मळ्यात तर त्या वर्षी अत्यंत चांगला ऊस आला होता. डाग मळ्यात १६-१७ एकर ऊस होता. गुऱ्हाळ लावणेही तोट्याचे होणार होते म्हणून त्यांनीही संपूर्ण डाग मळ्यातील १६-१७ एकराचा ऊस फड पेटवून दिला. मनाला जणू हजारो इंगळ्या डसल्या इतके दु:ख झाले. पण हतबलतेने केवळ पाहत राहण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. ऊसाचा फड असा पेटवून दिल्यावर त्या अग्निप्रत्ययातून जो ऊस पूर्णपणे जळला नव्हता, काळा पडून तसाच उभा होता. १९५१ हे वर्ष ऊसकरी शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच काळे वर्ष उगवले होते.

पण आश्चर्य म्हणजे १९५१ साली साखरेचा दर मात्र उत्तम होता. गुळाची हलाखी नि साखरेची नवलाखी गूळ आणि साखर दोनही एकच ऊसाची संतती, सख्खी भावंडे आणि त्यांच्यापासून शेतकऱ्याला लाभणाऱ्या मोबदल्यात एवढा विलक्षत फरक कसा. जो शेतकरी साखर कारखान्याला ऊस घालील त्याच्या घरी लक्ष्मीचे पाऊल उमटते, आणि जो गूळ ऊसाचा करतो, त्याला जीवनातून उठावे लागते. म्हणूनच

तात्यासाहेब म्हणत की, "माझ्या जीवनाला वळण लावणारे जे महाशक्तिशाली प्रवाह आहेत. त्यापैकी जळणाऱ्या ऊसाने निर्माण केलेले क्षोभशोक हा एक मुख्य आहे."[१] तात्यांना एक प्रकारची विचार शक्ती दिली म्हणून त्यांनी कोल्हापूरच्या शेतकरी सहकारी संघाचे अध्यक्ष "तात्यासाहेब मोहिते सहकार चळवळीमध्ये कार्य करणारे मोठे व्यक्तिमत्त्व होते. म्हणून तात्या तात्यासाहेब मोहिते यांना भेटले आणि म्हणाले, तात्यासाहेब, आज तुमच्या मागे शेतकरी संघाची बलाढ्य संस्था आहे. ह्या शेतकरी संघाने शेतकऱ्यांच्या आर्थिक भल्यासाठी, दारिद्रय नष्ट करण्यासाठी साखर कारखाना काढला पाहिजे. माझी तशी योजना आहे. ह्या कल्पनेला वास्तव रूप देण्यासाठी तुम्ही मदतीचा हात पुढे केला पाहिजे. शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांसाठी, शेतकऱ्यांनी काढलेला असा तो कारखाना पाहिजे. बघा, शेतकऱ्यांचं सगळ्या अर्थानं कोटकल्याण होईल."[२] शेतकरी बांधवांचे साखर कारखान्याने कोटकल्याण होईल; हे पुढील काळात सिद्धही झाले. तो काळ १९५१ सालचा होता. हा काळ म्हणजे तात्यांच्या जीवनाचा दुसरा कालखंडाला सुरूवात होणारा होता.

तात्यांच्या एकूण कर्तव्याचा आढावा घेत असताना दोन भाग पडतात. पहिल्या भागात स्थानिक नेतृत्वाचा कालखंड १९३५-१९५२ यामध्ये कुटूंबाचा व्यापार, उद्योग, सावकार व शेती हे पाहत कोडोलीच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकारण यामध्ये भाग घेतला. आपल्या नगराध्यक्ष पदाचा उपयोग ग्रामीण सुधारणेसाठी केला. सेवा सोसायटी, तसेच कर्मवीर भाऊराव पाटीलांचा विचार घेऊन १९४६ मध्ये कोडोली मध्ये वसतीगृह युक्त विद्यालयाची स्थापना, प्रजा परिषद, १९४२ ची चलेजाव चळवळ इत्यादीमध्ये तात्यांनी भाग घेतला. याचा अभ्यास तात्यासाहेब कोरे व्यक्ती परिचय व शैक्षणिक कार्य या प्रकरणामध्ये सविस्तर अभ्यास केला आहे. १९५१ साली डाग मळ्यातील १६-१७ एकर ऊसाचा फड पेटवावा लागला. त्यातून तात्यांच्या जीवानाला

एक वेगळे वळण मिळाले, आणि वारणा परिसरात सहकारी साखर कारखाना काढण्यासंबंधी विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्यासाठी त्यांनी तात्यासाहेब मोहिते यांच्या नेतृत्त्वाखाली प्रयत्नही सुरू केले, तात्यासाहेब सहकारी साखर कारखाना काढण्याअगोदर म्हणजे १९४९ मध्ये महाराष्ट्रातील कृषी अर्थव्यवस्थेला अभूतपूर्व आणि युगांतरी वळण देणारी घटना घडली. ही घटना म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे सहकारी मालकी तत्त्वावर निघालेला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा पहिला सहकारी साखर कारखाना. १९५१ साली तात्यासाहेब मोहिते यांच्या समवेत, प्रवरानगर येथे सुरू झालेला प्रवरा सहकारी साखर कारखाना पाहिला. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी साखर कारखान्याचा सर्व इतिहास सांगितला. प्रवरानगरहून तात्यासाहेब परतले ते भारावलेल्या अवस्थेतूनच. वारणा परिसरात सहकारी साखर कारखाना हे स्वप्न, वास्तवात उतरण्यासाठी पडतील तितके कष्ट उपसावयाचे या भावनेने सर्व कार्यकर्ते भारावून गेले.

वारणा परिसरात सहकारी साखर कारखाना उभा करण्याचे स्वप्न सत्यात उतरण्यासाठी जे नेतृत्त्व केले आणि तेथूनच पुढे तात्यांचे वारणा खोऱ्याचे नेतृत्त्व उदयाला आले. १९५२ ते १९९४ पर्यंत म्हणजे जीवनाच्या अखेर पर्यंत ते वारणेचे नेतृत्त्व करत होते. १९५२ मध्ये सहकारी साखर कारखाना काढण्याचे प्रयत्न फसले कारण तात्यासाहेब मोहिते यांची म्हणजेच त्यांच्या शेतकरी सहकारी संघाची मदत मिळणे कठीण झाले. त्यामुळे कारखाना स्थापन करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकले नाही. पुढे १९५४ मध्ये देशातील साखर उत्पादनाची तूट भरून काढण्याच्या दृष्टीने भारत सरकारने देशात नवीन तेवीस साखर कारखाने काढण्यासंबंधी परवाने देण्याचे ठरविले. त्यावेळच्या मुंबई प्रांतात साखर उत्पादाला अनुकूल परिस्थिती होती. त्यामुळे मुंबई प्रांतात नवीन बारा साखर कारखाने काढावेत असा आदेश दिला. वारणा परिसरात १९५२ सालीच शासनाच्या मदतीशिवाय साखर कारखाना काढण्यासंबंधी प्रयत्न झाले. पण तो प्रयत्न यशस्वी होऊ

शकला नाही. १९५४ साली तर केंद्र सरकारची मदत मिळणार होती. म्हणून तात्यांनी वारणा सहकारी साखर कारखाना उभारणीचा प्रस्ताव दिला. आणि तेथूनच पुढे तात्यांच्या नेतृत्त्वाला खरी सुरूवात झाली. पण साखर कारखाना उभा करणे ही साधी गोष्ट नव्हे, त्यासाठी तात्यांनी रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या साक्षीने तात्यांचे चार बंधू नाना, आप्पा, निळकंठ, गजानन आणि कुटुंबातील इतर या सर्वांच्या समोर तात्यांनी एक प्रार्थना केली. “मला माझ्या बंधूंना व परिवारातल्या मंडळींना यावेळी एक प्रार्थना करावयाची आहे. कारखाना म्हणजे अजस्त्र काम आहे. दिवसरात्र त्याच कामात गुंतले पाहिजे त्यासाठी ‘तात्यासाहेब कोरे’ यांना घरच्या जबाबदारीतून मुक्त करावं. यापुढे मी कोरे घराण्यातील कोणतीही प्रापंचिक जबाबदारी उचलणार नाही. तुम्ही सर्वांनी यासाठी मला रत्नाप्पाण्णांच्या साक्षीनं एकमुखाने संमती दिली पाहिजे. वचन दिलं पाहिजे. यापुढे मी या भागातील जनतेसाठीच काम करणार आहे, राबणार आहे.”[१] यालाच तात्या वानप्रस्थाश्रम असे म्हणतात. अथक परिश्रमाने १९५९ साली सहकारी साखर कारखाना सुरू झाला. त्यानंतर अनेक संस्था तात्यांच्या नेतृत्त्वाखाली टप्प्या-टप्प्याने उभ्या राहिल्या, पण सर्व संस्थांचे पालकत्व साखर कारखान्याकडे जाते. साखर कारखाना हा वारणा परिसरात क्रांती करू शकला. वारणेचे नाव संपूर्ण देशभर गाजू लागले. साखर उतारा, सभासदाना मिळणारा मोबदला म्हणजेच दर, तांत्रीक कार्यक्षता, नोकरांचा पगार, भाग विकास निधी इत्यादी बाबतीत वारणा सहकारी साखर कारखान्याने देशात अनेक वेळा प्रथम क्रमांक मिळविला.

साखर कारखान्यानंतर तात्यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक सहकारी संस्था उभ्या राहिल्या. त्यामुळे वारणा परिसरातील ग्रामीण भागाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. तात्यांच्या नेतृत्त्वाखाली उभी असणारी प्रत्येक संस्था ही ग्रामीण जनता केंद्रबिंदू मानून कार्य करत आहे. तात्यांनी वारणा परिसरात सहकाराचे जाळे निर्माण केले. १९६४

साली 'वारणा विभाग शिक्षण संस्था' स्थापन करून ग्रामीण जनतेच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन शिक्षण संस्था स्थापन केली. त्यामध्ये बालवाडी पासून ते महाविद्यालयापर्यंतचे तसेच अभियांत्रिकी शिक्षणाची सोय करण्यात आली. कृषिक्षेत्राला पूरक व्यवसाय म्हणून 'वारणा कोंबडी सहकारी संघाची' स्थापना १९६३ ला केली. इतरत्र हा व्यवसाय अयशस्वी झाला परंतु तात्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या जिद्दीने, चिकाटीने कोंबडी पालन व्यवसाय वारणा परिसरात यशस्वी झाला आहे. त्यामुळे आज अनेक शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून कोंबडीपालन सुरू केले आहे, आणि त्याला यशही आले आहे. कृषि-औद्योगिक समाज निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांची पत सुधारली पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर पैसे उपलब्ध होण्यासाठी, तसेच इतर छोटे उद्योगधंदे उभारण्यासाठी कर्ज आवश्यक असते. या सर्वामुळे वारणा परिसरात कृषी-औद्योगिक क्रांती होण्यास मदत होईल, म्हणून १९६६ साली 'वारणा सहकारी बँक' स्थापन केली. महात्मा गांधी जन्मशताब्दी महोत्सव १९६८ ला सर्वत्र साजरा केला. या पुण्यप्रद वर्षी कारखाना परिसरातील त्यावेळच्या ६६ गावांमध्ये विधायक कार्यासाठी 'श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धक मंडळ' ची स्थापना केली. या मंडळाने अनेक समाज उपयोगी कार्य केले आहे.

तात्यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक प्रकल्प उभे राहिले, आणि राहतच होते. पण शेती व्यवसायाला सर्वात जवळचा उद्योग म्हणजे दुग्ध प्रकल्प होय. दुग्ध प्रकल्प हा बागायतदार शेतकऱ्यांबरोबर जिरायतदार शेतकऱ्याला उपयुक्त आहे. म्हणून १९६८ साली वारणा दूध संघाची स्थापना केली. सुरूवातीला हा दूध संघ तोट्यात होता. परंतु तात्या व त्यांच्या सहकारी मित्रांनी मुंबई येथे दूध विक्री केंद्र सुरू केले त्यामुळे बंद पडणारा दूध संघ फायद्यात आला. १९८१ पासून या दूध संघाने अनेक उपपदार्थ निर्माण करण्यास सुरूवात केली. त्यामुळे हा दूध संघ आज देशातील एक आदर्श दूध संघ म्हणून गणला

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

आहे. गेल्या काही वर्षात तूप उत्पादनात देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. दूध संघ म्हणजे तात्यांच्या कार्याचा कळस आहे. वारणा परिसरातील जिरायतदार तसेच बागायतदार शेतकऱ्यांना दूध व्यवसाय फायद्याचा ठरला आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेच्या जीवनात आर्थिक साधने उपलब्ध झाली आहेत. वारणा म्हणजे विकास हे जसे समीकरण जमले आहे तसेच वारणा बझार म्हणजे नवनवे विक्रम असेही समीकरण जुळले आहे. आज वारणा बझारची वार्षिक विक्री ४३ कोटी झाली आहे. दोन डिपार्टमेंट स्टोअर्स असून ३२ शाखा आहेत. १९७८ ला स्थापन केलेल्या वारणा बझारने गेल्या २४ वर्षात भारतात ग्रामीण भागात प्रथम क्रमांक मिळविला आहे आणि ७७% महिला सभासद संख्या आहे. वारणा बझारने देशात सातत्याने विक्रीच्या बाबतीत प्रथम क्रमांक मिळविला आहे.

ज्या पद्धतीने तात्यांच्या नेतृत्त्वाखाली विविध उद्योग व शिक्षण संस्था उभ्या राहिल्या आहेत. त्याच पद्धतीने सांस्कृतीक क्षेत्रातही शंकरराव कुलकर्णी त्यांच्या सहाय्याने कार्य केले आहे. ४ ते ११ वर्षे वयाची बालके आहेत. त्यांनी 'वारणा बालचमूंचा वाद्यवृंद' स्थापन केला आहे. या वाद्यवृंदाने देशात तसेच परदेशात आपली कीर्ती गाजवली आहे. वारणा सहकारी साखर कारखान्याच्या प्रगतीमध्ये वाद्यवृंदाने मोठी भर घातली आहे. वारणेचे नांव सातासमुद्रापलिकडे पोहचवले आहे. हा वाद्यवृंद एकमेवद्वितीयच आहे असे नव्हे तर अस्तित्त्वात आल्यापासून त्यांचे फारसे अनुकरणही केलेले नाही. या वाद्यवृंदाने देशात सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे. १९७६ मध्ये युगोस्लाव्हियात आणि १९८९ मध्ये मॉरिशसमध्ये कार्यक्रम केले. या वाद्यवृंदाचा कार्यक्रम कधीही व्यापारी दृष्टीकोनातून केलेला नाही. तात्यांच्या कल्पक बुद्धीतून साकार झालेला हा वाद्यवृंद आहे. अनेक मान्यवर व्यक्तींनी त्यांची दाद घेतली आहे. तात्यासाहेब कोरे यांनी समाजातील आर्धी शक्ती वाया जावू नये म्हणून महिलांसाठी विविध संस्था स्थापन केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वारणा भगिनी मंडळ, श्री वारणा महिला गृहोद्योग

लिज्जत पापड केंद्र, श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था, सावित्री महिला औद्यागिक सहकारी संस्था या संस्था वारणा परिसराच्या विकासामध्ये मोलाचा वाटा उचलीत आहेत. महिलांना स्वतःच्या कुटुंबाची प्रगती करता यावी, यासाठी या सर्व संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्यामुळे महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लागणार आहे.

वरील सर्व संस्था तात्यांच्या नेतृत्त्वाखाली नियोजनबद्ध स्थापन झाल्या. पण या सर्व संस्थांच्या मागे वारणा सहकारी साखर कारखाना उभा आहे. त्यामुळेच सर्व संस्थांचे पालकत्व हे वारणा साखर कारखान्याकडे जाते. वारणा सहकारी साखर कारखान्याने केवळ साखर उत्पादनात एवढेच उद्दीष्ठ ठेवले नाही. तर अनेक उपपदार्थ निर्मितीला सुरूवात केली. १९६४ मध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा या परिसरातील श्री वारणा, पंचगंगा, शेतकरी (वसंतदादा) आणि कृष्णा या चार सहकारी साखर कारखान्यांच्या संयुक्त प्रयत्नाने 'भारत सहकारी कागद कारखाना' काढण्याचा विचार झाला होता. त्यासाठी कागद प्रकल्पाची सर्व माहिती घेण्यासाठी वरील चार साखर कारखान्यांचे अध्यक्ष तात्या, रत्नाप्पण्णा कुंभार, वसंतदादा पाटील आणि जयवंतराव भोसले तसेच काही शासनाचे प्रतिनिधी यांनी २५ सप्टेंबर १९६४ ते ११ नोव्हेंबर १९६४ असे पंचेचाळीस दिवसांच्या परदेश दौऱ्यावर जाऊन आले. त्यांनतर तात्या सातत्याने कागद प्रकल्प उभारणीसाठी प्रयत्न करत होते. चार सहकारी साखर कारखान्यांच्या प्रयत्नाने कागद प्रकल्प काढण्यासंबंधी प्रस्ताव रद्द होऊन वारणा साखर कारखान्याने स्वतंत्ररित्या कागद प्रकल्प हाती घेतला. १९८१-८२ या वर्षाचा कारखान्याचा वार्षिक अहवाल वारणा पेपर मिलमधून छापला. पण काही अडचणीमुळे कागद प्रकल्प पूर्ण वेळ चालू शकत नाही. ऊसकरी शेतकऱ्याला ऊसाचा उत्तम मोबदला मिळायला हवा असेल; तर साखर उद्योगाला, उपपदार्थावर आधारित पूरक उद्योगाची, जोड देण्याची गरज आहे. हे तात्यांच्या लक्षात आल्यावर पेपर प्लँट प्रमाणे डिस्टीलरीचा भाग स्विकारला

वास्तववादी सहकार-योगाची, ती योग्य दिशा होती. ती काळाची गरज होती. वारणा कारखान्याने डिस्टीलरीमध्ये दारू न बनविता इतर काही किफायतशीर रसायने बनविण्याचा तात्यांचा संकल्प होता. म्हणूनच डिस्टिलरीमधील स्पेंटवॉश व साखर कारखान्याकडील प्रेसमड यामध्ये मायक्रो जीवाणू मिसळून प्रक्रिया करून त्यापासून वारणा बायोअर्थ कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प सुरू केला आहे.

वारणा परिसरात मुख्य व्यवसाय म्हणजे शेती होय. १९८७ पर्यंत वारणा नदीला बारमाही पाणी नव्हते. वारणा नदीत फेब्रुवारी पर्यंतच पाणी असायचे तेथून नदी कोरडी. त्यामुळे शेतीला पाणी पुरवठा होत नव्हता. पण १९८७ नंतर चांदोली धरणाचे बांधकाम पूर्ण झाले त्यामुळे वारणा नदीला बारमाही पाणी पुरवठा होऊ लागला. त्याचा फायदा शेतीला होण्यासाठी वारणा साखर कारखान्याने अनेक पाणीपुरवठा योजना हाती घेतल्या. १९८७ पूर्वीही काही योजना अंमलात आणल्या आहेत. पण १९८७ नंतर खऱ्या अर्थाने पाणीपुरवठा योजना सुरू केल्या. आज ६० वारणा कारखाना पुरस्कृत पाणीपुरवठा योजना आहेत. तसेच तात्यांनी लहान आकाराची धरणे किंवा बंधारेही वारणा साखर कारखान्याच्या मदतीने बांधले. कोडोली, शिगांव, तांदुळवाडी इ. बंधारे वारणा कारखान्याने बांधले. त्यांची रक्कम नंतर शासनाने हप्त्याने कारखान्याला दिली. आज सर्व महाराष्ट्रभर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे हा जो शब्दप्रयोग वरचेवर ऐकू येतो, तो वारणा कारखान्याच्या अथक परिश्रमाने बांधलेल्या शिगांव धरणामुळेच. छोट्या धरणांमुळे लोकांचे नुकसान होत नाही. तसेच त्या भागापुरते पाणी मिळते म्हणून छोटी धरणे बांधणे गरजेचे आहे. छोट्या धरणांमुळे पुनर्वसन करावे लागत नाही. मोठ्या धरणांमुळे धरणाच्या खाली राहणाऱ्या लोकांना फायदा होतो. पण धरण ज्या भागात झाले आहे तेथील लोकांचे जीवन उध्वस्त होते. म्हणून मोठ्या धरणापेक्षा लहान धरणे बांधणे गरजेचे आहे.

२५ जून १९५४ रोजी रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्यासमोर सामाजिक कार्यासाठी तात्यांनी घरच्या जबाबदारीतून मुक्त झाले. तात्यासाहेब हे महात्मा गांधींच्या

विचारप्रणालीचे होते. त्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. गांधीजी म्हणत की, आपल्या धनाचे आपण स्वत: सामाजिक विश्वस्त बनायला हवे. म्हणून तात्यांनी असे म्हटले आहे की, ''माझे शेती व इतर उत्पन्न यांचा संचय करून जे काही माझ्यापाशी आहे त्याचा एक 'ट्रस्ट' मी या वर्षी धनत्रयोदशीला एकसष्टाव्या वर्षात पदार्पण करतेवेळी केला.''[४] वारणा खोऱ्यातील धर्मादाय सामाजिक कार्यासाठी एक नवी संस्था उभी केली. या ट्रस्टच नांव आहे. 'श्री तात्यासाहेब कोरे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट' या संस्थेने शैक्षणिक कार्यासाठी मदत, वैद्यकीय साहाय्य आणि सार्वजनिक हिताच्या कार्यक्रमांना उत्तेजन आणि गती लाभावी असे प्रयत्न केले. या ट्रस्टतर्फे भारतात किंवा परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांना कर्जाऊ शिष्यवृत्त्या दिल्या. तसेच नैसर्गिक विपत्ती यात सापडलेल्यांचे दु:ख निवारण व्हावे. म्हणून तत्काळ साहाय्य दिले.

तात्यांनी १९५२ ते १९९४ पर्यंत अनेक ग्रामीण विकासाची कामे वारणा परिसरात केली. त्यातील काही महत्त्वाच्या कामांचा उल्लेख वर केला आहे. तात्यांनी ४० वर्षात वारणेमध्ये अनेक उद्योग उभे केले, शिक्षण संस्था निर्माण केली, केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत तर त्या नावारूपाला आणल्या पण तात्या हे स्वस्थ बसणारे नव्हते. १९९० मध्ये त्यांचा 'अमृतमहोत्सव' संपूर्ण वारणा परिसराने साजरा केला. त्याच्या अगोदर म्हणजे १ डिसेंबर १९७४ ला तात्यासाहेबांच्या षष्ठद्विपूर्ती सत्कार महाराष्ट्राचे शिल्पकार आणि त्यावेळचे भारताचे परराष्ट्रमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतदादा पाटील प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक होते. तर या सर्व कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष रत्नाप्पाण्णा कुंभार होते. १९९० साली अमृतमहोत्सव साजरा झाल्यानंतर वारणा परिसराचे किंवा आपल्या एकूण कार्याचे अवलोकन करत असताना त्यांना अजुन काही गोष्टींची कमतरता वाटली. जी काही कामे झाली आहेत त्यांची वारणा परिसराला आवश्यकता होतीच. पण काही प्रकल्प हाती घेतले आहेत, ते पूर्ण करणे गरजेचे आहे.

**तात्यासाहेब कोरे यांचे संकल्प :-**

१९८९ ची वारणा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक तात्यांच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण पॅनेल सरासरी १२०० मताच्या फरकाने विजयी झाले. हीच तात्यांच्या नेतृत्त्वाखाली शेवटची निवडणूक ठरली. १९८९-९० पर्यंत तात्यांचे वारणेच्या प्रत्येक संस्थेच्या कारभारात बारकाईने लक्ष असे. पण १९९० नंतर वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यानंतर तब्येतीच्या कारणास्तव तात्यांना पूर्वीइतके संस्थेच्या कारभारात लक्ष देता येत नव्हते. तरीसुद्धा काही संकल्प हाती घेतले होते. व ते पूर्ण होण्याच्या मार्गाला होते, तर काही सुरू होते. तात्यांचे अनेक संकल्प होते, पण त्यापैकी महत्त्वाचे काही होते ते पुढीलप्रमाणे :

**महात्मा गांधी मेडिकल ट्रस्टची स्थापना :-**

वारणेमध्ये अनेक संस्था उभ्या केल्या, त्या यशस्वी केल्या. या संस्था उभ्या करताना अनेक संकटे आली, पण सर्वांच्या मदतीने ती संकटे दूर झाली. म्हणून तात्या म्हणतात "संकटांच्या राशींनी आमची जिद्द आमची उभारी कधी मोडकळीस आणली नाही, उलट संकटे म्हणजे प्रगतीची नवी संधी, असेच वाटत गेले. कारण आपण लोककल्याणाचे सामाजिक कार्य करतो आहोत, ही दूरगामी सत्परिणामांचे विधायक कार्य करतो आहोत, ही आम्हाला जाणीव होती आणि हीच जाणीव, हीच श्रद्धा, आम्हाला आतून बळ देत होती."[५] ज्यावेळी साखर कारखाना उभा करण्याचा विचार तात्यासाहेब करत होते. तेंव्हा वारणा परिसरातील काही ठराविकच व्यक्ती म्हणत होती की, सातव्याची चार खुळी नि कोडोलीतला एक वाणी यांनी कारखाना स्थापन करण्याचे स्वप्न बाळगले आहे. पण या टिकाकारांना नंतर काही दिवसांत साखर कारखाना प्रत्यक्ष उभा राहिल्यावर हे लोक चकितच झाले. थोडक्यात तात्यांचा स्वभाव असा होता की,

''कोठल्याही योजनेसंबंधीचा विचार आपल्या मनात पक्का झाल्याशिवाय, तो इतरांजवळ बोलून दाखवायचा नाही, हा माझा स्वभाव आहे.''[६] तात्यांच्या मनात एक विचार घोळत होता. तो म्हणजे वारणा परिसरात गोरगरिबांच्यासाठी उत्कृष्ट तऱ्हेची रूग्णसेवा उपलब्ध व्हावी. यासाठी एक हॉस्पिटल वारणाकाठी उभारण्याचा संकल्प होता. कारण या वारणा परिसरामध्ये, तसेच आसपासच्या भागामध्ये, सामान्यत: सांगली, कोल्हापूर जिल्ह्यासंबंधी बोलायचे तर, ग्रामीण भागातील परिसरातील गरीब माणसांना आजारी पडल्यानंतर, केवळ त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्यामुळे, चांगल्या प्रकारची रूग्णसेवा उपलब्ध होत नाही. एवढेच नव्हे तर शहरातल्या मोठ्या दवाखान्यातही, गरिबीमुळे ती जाऊ शकत नाहीत आणि अनेकवेळा वेळेवर व योग्य उपचाराच्या अभावी ती दुर्दैवाने मृत्यूमुखी पडतात. हे चित्र खरोखरच भयानक आहे. तशी ही परिस्थिती देशातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी आहे. मात्र वारणा परिसरात हे चित्र बदलविण्याची जबाबदारी, सर्वांच्यावर आहे. १९७६-७७ च्या दरम्यान तात्यांनी आपल्या सहकारी मित्रांना ही गोष्ट बोलून दाखविली. नेहमीप्रमाणे त्यांनी उचलून धरली. चांगल्या प्रकारचे, सुसज्ज असे हॉस्पिटल उभारायचे तर अर्थातच त्याच्यासाठी तशा प्रकारची वेगळी संस्था निर्माण केली पाहिजे. या विचारांनी 'महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट' नावाची संस्था तीन नोव्हेंबर १९७७ ला रजिस्टर केली. नियोजित हॉस्पिटल कसे असावे, यासंबंधी महाराष्ट्रातील नामवंत डॉक्टरांशी तात्यांनी चर्चा केली.

महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट स्थापन करताना सुसज्ज, भव्य हॉस्पिटलचे स्वप्न तात्यांनी पाहिले. हॉस्पिटलमध्ये प्रत्येक उपचार पद्धतीमधील अत्यंत निष्णात असे डॉक्टर्स आणि वैद्य असतीलच. शिवाय आठवड्यातून, पंधरा दिवसातून, अगर महिन्यातून एखादा दिवस, महाराष्ट्रातील किंवा देशातीलही, निरनिराळ्या विषयाच्या रोगाच्या तज्ञ, विख्यात डॉक्टरांनी इथे येऊन, त्या त्या रोग्यांची तपासणी करून सल्ला

देतील. तसेच एकच मोठा जनरल वॉर्ड न बांधता छोटे-छोटे जनरल वॉर्ड बांधण्याची सोय करण्यात आली. मेडिकल ट्रस्टला महात्मा गांधीजींचेच नांव देण्याचे ठरविले कारण "गांधींनी सर्व आयुष्य परपिडा दूर करण्यासाठी, सर्व देशाची पीडा दूर करण्यासाठी झिवले. हाच आदर्श समोर ठेवून, दु:खितांची, व्याधिग्रस्तांची, आजाऱ्यांची वेदना दूर करून त्यांना आनंददायी आणि निरामय जीवन लाभावे, या हेतूनेच आम्ही आमच्या या ट्रस्टला पूज्य गांधीजींचे नांव दिले"* या ट्रस्टच्या गव्हर्निंग कौन्सिलवर नामवंत डॉक्टर मंडळी आहेत. तसेच मेडिकल ट्रस्टच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीजवर, वारणा साखर कारखान्याचे, ज्या-त्या वेळचे संपूर्ण संचालक मंडळ राहणार आहे, अशी मेडिकल ट्रस्टच्या घटनेत तरतूद करण्यात आली आहे. ह्या हॉस्पिटलसाठी तीस एकर जागा पारगांव, ता. हातकणंगले येथे घेतली. वारणा साखर कारखाना, वारणा दूध संघ, वारणा बँक इ. च्या सहकार्याने बरेच दिवस रखडलेला प्रकल्प २ ऑक्टोबर १९९२ रोजी तात्यासाहेबांच्या अखेरच्या काळात सुरू झाला. हे हॉस्पिटल चालविण्यासाठी महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट असून आपल्या विभाग विकास निधीतून आर्थिक मदत केली जाते. अनुभवी डॉक्टर्स, नर्सेस व स्टाफ, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने या भागातील जनतेसाठी २४ तास सेवा हे हॉस्पिटल करत आहे. या हॉस्पिटलमार्फत मोफत वैद्यकीय शिबीरे आपल्या कार्यक्षेत्रामध्ये घेतली जातात. त्यावेळी तज्ञ डॉक्टर्स बोलावून मोफत चिकित्सा व उपचारही खेडोपाडी केले जातात. काही ठिकाणी ओ. पी. डी. विभागही सुरू केले आहेत. ॲलोपॅथी, होमिओपॅथी आयुर्वेद, निसर्गोपचार आणि योगासने असे प्रमुख पाच विभाग आहेत. शिवाय प्रत्येक विषयाचे तज्ञ डॉक्टर आहेत. मिरज, पुणे, मुंबई इथले तज्ञ डॉक्टर महिन्यातील ठराविक दिवशी भेट देतात. या हॉस्पिटलला एकूण ५ कोटी रूपये सुरूवातीला खर्च आला. त्यामध्ये विस्तार होईल तसे वाढ झाली आहे. वारणा साखर कारखाना, वारणा बँक, वारणा दूध संघ यांची मोठी आर्थिक मदत झाली. आज २०० कॉटस् आहेत. पण पाहिजे तेवढ्या क्षमतेने हे हॉस्पिटल

चालत नाही. तात्यांनी ग्रामीण जनतेला आवश्यक असणारी वैद्यकीय सोय उपलब्ध करून दिली आहे. हे हॉस्पिटल उभे करणे हा तात्यांचा संकल्प होता. आपल्या अखेरच्या काळात तो संकल्प पूर्ण केला.

ज्या पद्धतीने वारणा परिसरातील जनतेच्या आरोग्यासाठी हॉस्पिटल होणे आवश्यक आहे, असे तात्यांना वाटत होते. तसेच शेती मालासंबंधीच्या प्रक्रिया बारमाही शाश्वत पाणीपुरवठ्याच्या अभावी, आजवर वारणा साखर कारखान्याला शेती विकासाचे शास्त्रशुद्ध नियोजन करणे शक्य नव्हते. पण १९८७ नंतर वारणा नदीवरील चांदोली प्रकल्पाचे काम पूर्ण झाले होते. त्यामुळे आता वारणा नदीला बारमाही पाण्याची सोय झाली. अशा स्थितीत केवळ ऊस पीक हे पैस मिळवून देणारे पीक आहे, असे न मानता शास्त्रशुद्ध पायावर फळबागा, तसेच भाजीपाला आणि इतर पैसे मिळवून देणारी पिकेही घेतली पाहिजेत. "सामान्यत: शेतकऱ्याने आपल्या शेतीवरील पिकाचे नियोजन करताना, १/३ जमिनीत ऊस, १/३ अन्नधान्य पिके आणि १/३ शेतीत फळबाग आणि भाजीपाला अशाप्रकारे स्थूलमानाने नियोजन करण्याचा मानस आम्ही प्रकट केला आहे."[८] ज्योवळी शेतकरी आपल्या जमिनीत फळबाग लावतील पण त्या फळांना बाजारपेठ उपलब्ध होणे आवश्यक आहे किंवा फळावर प्रक्रिया होणे गरजेचे आहे. यासाठी २० ऑक्टोबर १९८७ ला श्री वारणा ॲग्रीकल्चरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी स्थापना केली आहे. कार्यक्षेत्र पन्हाळा तालुक्यातील १४ गावे हातकणंकले तालुक्यातील ३० गावे, सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील १९ गावे आणि शिराळा मधील ६ गांवे, अशी एकूण ६९ गावे आहेत. वारणा कारखान्याच्या परिसरामध्ये एकूण एक लाख, तीन हजार एकर जमीन लागवडीस उपयुक्त आहे. त्यापैकी १९८९ च्या दरम्यान तेवीस हजार एकर जमीन बागायत असून, बाकी ऐंशी हजार एकर जमीन बागायत होणे गरजेचे होते.

ॲग्रीकल्चरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटीला भरीव यश मिळण्यासाठी सुनियोजित कार्यपद्धती हवी, हे सारे लक्षात घेऊन संस्थेच्या संचालकांनी, बंगलोर आणि म्हैसूर येथे सी. एफ. टी. आर. आय. आणि डी. एच. आर. एल. मध्ये जावून फळांच्या प्रक्रिया संबंधात तसेच प्रक्रिया मशिनरी संबंधात सर्व माहिती घेतली. त्याचप्रमाणे या संबंधात मिटकॉन, एन. सी. डी. सी. आणि डायरेक्टर ऑफ मार्केटिंग, पुणे यांच्याशी तपशीलवार चर्चा झाली. शंभर टक्के निर्यातीच्या तत्त्वावर, पश्चिम जर्मनी येथील फळभाज्या प्रक्रियेमधील एक अग्रगण्य कंपनी मे. हेनशील एक्स्पोर्ट यांच्या प्रतिनिधी समवेत तपशीलवार चर्चा झाली. तसेच त्याच्याबरोबर प्राथमिक स्वरूपाचा करार करण्यात आला. तात्यासाहेबांनी संपूर्ण परिसराचा दौरा केला. आणि फळबागांचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगितले. त्याचाच परिणाम म्हणून १९८९-९० मध्ये वारणा परिसरात केळीची लागवड मोठ्या प्रमाणात झाली. पण उत्पादकाचा माल योग्य दरात विकला गेला नाही. कारण पुरवठा मोठ्या प्रमाणात झाला आणि मागणी कमी होती. तसेच फळांवर प्रक्रिया करणारा कारखाना नव्हता, तो काढण्यासाठी तात्यांचा संकल्प होता. वारणा परिसरात उत्पादन झालेल्या फळांवर आणि भाजीपाल्यावर प्रक्रिया केल्यानंतर आणि त्याची संपूर्ण निर्यात परदेशी केल्यावर, या शेतीमालाला निश्चित जादा दर मिळेल आणि त्यामुळे वारणा शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल. त्यासाठी चिक्कू, पपई, केळी, आंबे, द्राक्षे, डाळींब यासारखी फळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून त्यावर प्रक्रिया करून त्यापासून पेये रस, पल्प, कॅनिंग, जाम इत्यादी पदार्थ तयार करून देशातील सर्व बाजारपेठांमधून विक्री करणे, तसेच त्यांची निर्यात करणे इत्यादी कामे तात्यांना अपेक्षीत होती. या सर्व प्रकल्पाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होणार आहे. सुरवातीच्या कालावधीमध्ये सुमारे आठ कोटी खर्चाचा प्रकल्प होता. नंतर परिस्थितीचे अवलोकन करून आणि परदेशी बाजारपेठांचा अभ्यास करून, प्रकल्पाचे विस्तारीकरण करणे शक्य होईल. पण १९९३ नंतर तात्यांची तब्येत अतिशय खालावली त्यांना कोणत्याही प्रकारची

हालचाल करता येत नव्हती. त्यामुळे त्यांचा हा प्रकल्प त्यांच्या हयातीत पूर्ण झाला नाही. पण नंतर हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला.

वरील दोन संकल्पाशिवाय अनेक छोटी-मोठी स्वप्ने तात्यांच्या नजरेसमोर होती, दुग्ध प्रकल्पाच्या अनुषंगाने चॉकलेट कारखाना, बोर्नव्हिटा सारखी उत्पादन निर्मिती, बेबीपूड सारख्या उत्पादनाची निर्मिती यासारख्या गोष्टींसाठी कारखाने तसेच वारणा औद्योगिक वसाहत इ. उभारण्याचा त्यांचा संकल्प होता. तात्यांच्या अखेरच्या काळात त्यातील काही संकल्प पूर्ण झाले व काही त्यांचे वारस म्हणून वारणेमध्ये काम करणारे विलासदादा कोरे आणि नंतर आमदार विनय कोरे (सावकर) यांनी पूर्ण केले व काही प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न चालू आहे.

तात्यांच्या आयुष्यातील शेवटची दोन वर्ष आजारपणातच गेली. कारण त्यांचे वय ऐंशीकडे गेले होते, वय झाल्यामुळे त्यांना फारशी हालचाल करता येत नव्हती. अशा वारणा विविध उद्योग व शिक्षण समुहाचे संस्थापक, वारणा खोऱ्याचे भाग्यविधाते, लाखो ग्रामीण लोकांच्या आशेचा कल्पवृक्ष सहकारमहर्षि मा. वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे यांचे मंगळवार दि. १३ डिसेंबर १९९४ रोजी महानिर्वाण झाले. तात्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालविण्याचे काम तात्यांचे जेष्ठ चिरंजीव विलासराव कोरे यांनी करण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने त्यांचे नेतृत्त्व वारणा खोऱ्याला दिर्घकाळ लाभले नाही. केवळ वर्ष-दिडवर्षाचे नेतृत्त्व मिळाले. त्यानंतर तात्यांचे नातू विनय कोरे यांनी मोठ्या जिद्दीने वारणेचे नेतृत्त्व केले आहे. तात्यांचे अनेक संकल्प पूर्ण केले. शिवाय अनेक नवीन कामे हाती घेतली. त्यांचा तपशील पुढे सांगितला आहे.

**विलासराव (दादा) कोरे वारणा खोऱ्याचे अल्प नेतृत्त्व :-**

तात्यासाहेब कोरे यांनी वारणा खोऱ्यात मोठे काम केले होते. ग्रामीण विकासाचा ध्यास घेतला होता. ४० वर्ष वारणा परिसरासाठी रात्रदिवस कष्ट करून अनेक

उद्योग व शिक्षण संकुले उभे केली. पण १९९२ नंतर तात्यांना संपूर्ण वारणा खोऱ्यावर लक्ष देता येईना. अशावेळी संपूर्ण वारणा परिसराचे डोळे एका प्रश्नाकडे लागले होते की, तात्यांनंतर वारणेचे नेतृत्त्व कोण करणार ? एवढा सहकाराचा व्याप सांभाळणारे कोण ? नेतृत्त्व करण्यास कोणीही तयार होईल ? पण तात्यांचा जो आदर्श होता; तशा प्रकारचे नेतृत्त्व वारणेला मिळेल का ? असा प्रश्न संपूर्ण वारणा परिसराला पडला होता. ज्या पद्धतीने नेहरूनंतर देशाचे नेतृत्त्व कोण करणार असा संपूर्ण देशाला प्रश्न पडला होता. त्याच पद्धतीने तात्यांनंतर वारणेत काय होणार असा प्रश्न पडला होता आणि तसे वाटणे साहजिकच आहे. कारण वारणेच्या या ओसाड माळावर तात्यांनी आपल्या नेतृत्त्वाने व कर्तृत्त्वाने नंदनवन निर्माण केले. आज वारणानगर फार आकर्षक दिसते ते सहजासहजी निर्माण झाले नाही. त्यासाठी तात्या व त्यांच्या सहकाऱ्यांना फार कष्ट झाले. तात्यांच्यामुळे वारणेमध्ये अनेक उद्योग उभे राहिले आणि घोरपडे आण्णा यांच्यामुळे वारणेला शोभा आली. आज वारणा नगर जे निसर्गरम्य दिसते त्यात निवृत्ती विठोजी घोरपडे तथा घोरपडे आण्णा यांचा फार मोठा वाटा आहे. अशा परिस्थितीत वारणेचे नेतृत्त्व केले ते तात्यांचे जेष्ठ चिरंजीव श्री विलासराव कोरे यांनी केले.

विलासराव कोरे हे कृषीपदवीधर होते. त्याचबरोबर कागदनिर्मिती,कृषि उपयुक्त खतनिर्मिती तसेच इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र या क्षेत्रात त्यांचे ज्ञान चांगले होते. शिवाय दुग्धोत्पादन क्षेत्रातही त्यांचा अभ्यास होता. वारणेचे संपूर्ण नेतृत्त्व स्विकारण्यापूर्वी ते वारणा सहकारी दूध संघाचे संचालक म्हणून काम करत होते. त्यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन हा नवनिर्मितीचा होता. विद्यार्थी हा किती शिकला यापेक्षा तो काय शिकला, याला ते महत्त्व देत होते. विद्यार्थ्यांनी तारूण्याची अनेक वर्षे शिक्षणात घातल्यावर त्यांचा पोटाचा प्रश्न मिटावा यासाठी तंत्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. आपापल्या जो आवडीचा व्यवसाय असेल तो करावा. सरकार कोणतेही असो सर्वांना नोकरी मिळणार नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यासाठी पडेल ते काम करण्याची जिद्द ठेवली पाहिजे. इंग्रजी भाषा परकीय असली तरी तिला आज पर्याय नाही. यासाठी इंग्रजी आले पाहिजे, दादांचे इंग्रजी विषयावर अत्यंत प्रभुत्व होते. अशा सर्व गुणसंपन्न व्यक्तीकडे वारणा खोऱ्याचे नेतृत्त्व आले होते. "ते सांगत की, मला तात्यांचा मुलगा म्हणून ओळखण्यापेक्षा विलासराव कोरे म्हणून माझी ओळख पटावी, तीहि कार्यातून, जाहिरात अथवा राजकारणातून नव्हे."[१] विलास दादा हे वसंतदादा पाटील यांना खूप मानत असत. केवळ सातवी शिकलेले वसंतदादा महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे ते तीन वेळा मुख्यमंत्री झाले. राज्यस्थानचे राज्यपाल झाले, त्यावेळच्या परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण कमी झाले असले तरीसुद्धा त्यांनी अनेक क्षेत्रात ज्ञान मिळवले. विलासराव दादा हे वसंतदादा यांच्याकडून फक्त समाजकारण शिकले. राजकारण हा त्यांचा स्वभावच नव्हता. शेतकऱ्यांनी केवळ ऊस शेती करू नये तर शेतीत फेरबदलाची पिके घ्यावीत. ते स्वत: कृषिपदवीधर होते. त्यामुळे शेतीतील ज्ञान होते. शेतकऱ्यांनी फळबागा, भाजीपाला यांना प्राधान्य द्यावे. वारणा परिसरात फळबागा होणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांचे मेळावे घेतले. तात्यांच्या काळात म्हणजेच १९८७ ला स्थापन झालेले श्री वारणा ॲग्रिकल्चरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी (वॅप्कॉस) हा प्रकल्प पूर्ण करण्यास विलासदादांनी विशेष प्रयत्न केले.

वॅप्कॉस हा प्रकल्प विलासदादांच्या प्रयत्नांमुळेच वारणा परिसरात काढण्याचा प्रयत्न झाला. पण तात्या असेपर्यंत पूर्ण झाला नाही. पण दादांनी तो प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनेक तंत्रज्ञांची माहिती घेतली. फळावर प्रक्रिया करून त्यापासून उत्पादित होणारी उत्पादने परदेशात निर्यात व्हावीत. व त्याद्वारे आपल्या परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक विकास साधला जावा यासाठी १०० टक्के निर्यातप्रधान हे या प्रकल्पाचे खास वैशिष्ट्य होते. या प्रकल्पाद्वारे आंबा, पपई, केळी, पेरू, टोमॅटो व हिरवी मिरचीपासून पल्प आणि प्युरी तयार करून उच्च परदेशी तंत्रज्ञानाच्या सहकार्याने ही

उत्पादने चांगल्या भावामध्ये विक्री या प्रकल्पाच्या माध्यमातून केली जाणार आहे. हा प्रकल्प हा देशातील सहकार क्षेत्रातील कृषि औद्योगिक व सामाजिक विकासास नवी दिशा देणारा पहिला ग्रामीण प्रकल्प म्हणून ओळखला जातो. या प्रकल्पामुळे शेतकऱ्याची आर्थिक उन्नती होणार असून वारणा परिसरामध्ये रोजगारांची संधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक विकास वाढीबरोबर उच्च तंत्रज्ञानावर आधारित करून सर्वसामान्य जीवनमान उंचावणे हे विलासदादांचे स्वप्न होते. विलास दादांच्या कार्यीकिर्दीत सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे ह्या प्रकल्पाला चालना होय.

विलास दादांचे दुग्ध व्यवसायाचे ज्ञान होते. ते १९८४-८५ पासून वारणा दूध संघाचे संचालक होते. वारणा परिसरात वारणा दूध संघाने 'धवल क्रांती' केली असे उद्‌गार काढले जातात. हे वारणा दूध संघाला यश प्राप्त करून देण्यात दादांचाही वाटा आहे. १९८५ मध्ये विलास दादा, वारणा दूधसंघाचे अध्यक्ष नानासाहेब कोरे, श्री. ज. बा. तथा अण्णासाहेब पाटील हे तीन संचालक अमेरिका, इटली फ्रान्स, इंग्लंड, हॉलंड, आर्यलंड, स्कॉटलंड, डेन्मार्क या देशांना भेटी दिल्या. विद्यापीठातील तंत्रज्ञान, शाखाना रिसर्च इन्स्टिट्यूटना भेटी दिल्या. तसेच नवे-नवे डेअरी तंत्रज्ञान व प्रगती इ. संबंधी चर्चा केली. सुधारीत देशात दूधावर प्रक्रिया करून त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. हे लक्षात आल्यानंतर वारणेमध्ये सुद्धा अनेक उपपदार्थ तयार करण्यात आले. सुरूवातीच्या काळात वारणा दूध संघ केवळ दूध संकलन करून शासकीय दूध संघाना दूध पुरवठा करत होता. पण १९८५ नंतर वारणेच्या दूधापासून उपपदार्थ तयार होण्यास सुरूवात झाली. आज वारणेची एकूण १० पदार्थ बाजारपेठेमध्ये आहेत. वारणा दूध संघ भरभराटीला आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून तात्यासाहेबांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. ते वारणा दूध संघाचे उपाध्यक्षही होते. दूध संघाला अडचणीच्या काळात विज्ञान, तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्या अडचणीवर मात

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

करण्यास दादांनी प्रयत्न केला. त्यांना राजकारणात फारसा रस नव्हता, कृषि, उद्योग व शिक्षण क्षेत्रात नवनिर्मिती करण्यास त्याचा सातत्याने प्रयत्न होता.

**१९९४ ची साखर कारखाना निवडणूक व विलासदादांचे नेतृत्त्व :-**

जून १९९४ मध्ये वारणा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणूक लागली. तात्यासाहेब कोरे यांचे वय ८० झाले होते. ते बिछान्यावर पडून होते. त्यामुळे या निवडणूकीत त्यांना भाग घेता आला नाही. १९५४ पासून वारणा साखर कारखान्याच्या प्रत्येक निवडणूकीत तात्यांनी नेतृत्त्व करून पॅनेल विजयी केली. काहीवेळा तर निवडणुका अत्यंत चुरशीच्या झाल्या. उदा १९६५, १९६७ त्यानंतर तात्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक निवडणूक तात्यांचेच पॅनेल विजयी झाले. १९९४ च्या निवडणूकीत वारणेचे नेतृत्त्व आपल्या हाती घेण्यास अनेक व्यक्ती इच्छुक होत्या. 'आता नाही तर कधी नाही' असा सूर विरोधकांचा होता. कसल्याही परिस्थितीत वारणेची निवडणुक जिंकायची होती, कारण सहकारात बलाढ्य काम करूनही सार्वजनिक राजकारणात तात्यासाहेब उतरले नाहीत. अशा दुर्मिळ व्यक्तीत तात्यांची गणना करण्यात येत होती. त्यांना आमदार, खासदार, मंत्री इत्यादी पदे सहज भोगता आली असती, पण तात्यासाहेब राजकारणापासून अलिप्त राहिले. पण सर्वांनाच ते जमणार नव्हते. वारणेची एकदा सत्ता आपल्या हातात आल्यानंतर बाहेरील राजकारणावर पक्कड घट्ट करता येईल. या हेतूने अनेक व्यक्तींनी वारणेच्या निवडणूकीत भाग घेतला. अशा परिस्थितीत सत्तारूढ गटाचे नेतृत्त्व विलासदादा यांच्याकडे देण्यात आले. दादांनी नेतृत्त्व स्विकारले तर आपल्याला सत्तेत भाग मिळणार नाही असे बऱ्याच व्यक्तींना वाटले, अंतर्गत धुसमूस उडाली, त्यामुळे वारणेची निवडणूक वादळी होणार याची चिन्हे दिसू लागली. त्यात विलासदादा हे संयमी, शांत वृत्तीचे होते. राजकारणाबद्दल त्यांना फारशी आपुलकी नव्हती (आवड नव्हती) विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, समाजकारण त्यात त्यांना विशेष रस होता.

अशा परिस्थितीत सत्तारूढ आघाडीतील काही संचालकांनी बंड करून बाहेर पडली, त्यात प्रामुख्याने पारगांवचे शहाजीराव भाऊसाहेब पाटील बहिरेवाडीचे शिवाजीराव आनंदराव पाटील, येलूरचे गोविंदराव बाबासो जाधव, वारणा बँकेचे अध्यक्ष बापूसो यशवंत पाटील (अंबप) आणि सर्वात महत्त्वाचे प्रमोदराव कोरे (उपाध्यक्ष, वारणा बँक) अशा काही प्रमुख व्यक्तींनी विलासराव कोरे यांच्या नेतृत्त्वाला आव्हान दिले. वरीलपैकी शहाजीराव पाटील, प्रमोदराव कोरे यांनी विरोधी पॅनेल तयार करण्यात महत्त्वाची भूमिका घेतली. सत्तारूढ गटातील काही बाहेर पडलेली मंडळी, तात्यांचे पारंपारीक विरोधक म्हणून ओळखणारे आमदार यशवंत एकनाथ पाटील आणि वारणा सहकारी साखर कारखान्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेचे प्रतिनिधीत्व करणारे महादेव रामचंद्र महाडीक या सर्वांनी एकत्र येऊन कोरे विचार मंच नावाने पॅनेल तयार केले. महादेवराव महाडीक प्रत्यक्ष स्वत: निवडणुकीत नसले तरी त्यांचे बंधू पांडुरंग महाडीक (येलूर) हे पॅनेलमधील उमेदवार होते. त्यामुळे दोन्ही पॅनेलमध्ये मोठी चुरस झाली. सत्तारूढ आघाडीतील विलासराव दादांच्या बरोबर कारखान्याचे व्हा. चेअरमन बाजीराव बाळाजी पाटील, घोरपडे अण्णा अशी काही जुनी त्यांचबरोबर काही नवी असे तात्यासाहेब कोरे पॅनेल तयार झाले. या पॅनलमध्ये स्त्रीप्रतिनिधी म्हणून श्रीमती सावित्री विश्वनाथ कोरे यांचा समावेश होता. प्रथमदर्शनी गट क्रमांक एक आणि दोन मध्ये विरोधक मोठी आघाडी होतील असे वाटत होते. वातावरण निर्मिती मोठी झाली होती. कोरे विचारमंचामध्ये अनेक वक्ते होते. त्यामुळे प्रचार कार्यात ह्या पॅनलने अनेक सभा गाजवल्या, तर सत्तारूढ आघाडीत विलासराव कोरे संयमी नेतृत्वाने तात्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालविण्यासाठी विज्ञान तत्रज्ञानाची गरज आहे, केवळ ऊसाचे उत्पादन करून चालणार नाही, तर शेतीचा पोत सुधारण्यासाठी फेरबदलाची पिके घेणे गरजेचे आहे. वारणा खोऱ्यात नवे तंत्रज्ञान आणणे गरजेचे आहे. तसेच ऊसाला जादा दर मिळण्यासाठी उपपदार्थ निर्माण करण्याचे कारखाने काढले पाहिजेत तरच शेतकऱ्याला परवडणार आहे,

असे प्रत्येक सभेत सांगितले शेवटी निवडणुकीत विलास कोरे यांच्या नेतृत्त्वाखालील पॅनेल चार हजार मतांच्या फरकाने निवडून आले. विरोधकांचा आवाज पोकळ ठरला. विरोधात आमदारांची सत्ता, महाडीक यांच्यासारखी ताकद व सत्तारूढ तसेच घरची काही मंडळी या सर्वांचा मोठा पराभव झाला. कारखान्याच्या सुज्ञ सभासदांनी तात्यांचा वारसा म्हणून विलासदादांचे नेतृत्त्व स्विकारले.

या निवडणुकीच्या निमित्ताने विलासदादांचे चिरंजीव व तात्यासाहेब कोरे यांचे नातु विनय कोरे (सावकर) यांचे युवानेतृत्त्व पुढे आले. तात्यासाहेब कोरे पॅनेलची संपूर्ण प्रचार यंत्रणा विनय कोरे यांनी सांभाळली. एक भारदस्त नेता म्हणून त्यांची प्रतिमा उठून दिसू लागली. कारखान्याच्या निवडणूकीनंतर विलास कोरे हे वारणेचे अध्यक्ष झाले. त्यांचा ज्ञानाचा फायदा वारणानगरला झाला, कृषि, औद्योगिक, शैक्षणिक क्षेत्रात ते नवनवीन सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात कारखान्याची प्रगती चालू होती. "साखर उतारा १२.७९ होता. हा उतारा देशपातळीवर द्वितीय क्रमांकाचा होता. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ यांचेमार्फत ऊस विकास कार्यासाठी दिले जाणारे सन १९९३-९४ चे प्रथम पारितोषिक देण्यात आले."[१०] कारखान्याचे अध्यक्षपद म्हणजे संपूर्ण वारणा विविध उद्योग तसेच शिक्षण संस्थांचे नेतृत्त्व त्यांच्याकडेच होते. संपूर्ण कारभार तात्यांच्या काळात ज्या पद्धतीने चालत होता त्याच पद्धतीने पुढे चालविण्याचे काम विलासदादांनी केले आहे.

विलासदादांच्या संचालक मंडळाने आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला तो म्हणजे कै. तात्यासाहेब यांचे नांव या परिसरांत चिरंतर व्हावे या उद्देशाने कारखान्याचे नांव "तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर असा नामविस्तार करण्याची तसेच तात्यांचा पुर्णाकृती पुतळा व स्मारक उभारण्यासाठी संचालक मडळाने शिफारस केलेली आहे. तसा प्रस्ताव ३८ व्या वार्षिक साधारण सभेत

मंजूर करण्यात आला."[११] प्रत्येक गोष्ट ही अभ्यासपूर्ण करण्यात दादा प्राधान्य देत होते. ज्यावेळी कारखान्याचा नामविस्तार करण्याची सुचना सर्वसामान्य जनतेतूनच येऊ लागल्या तेंव्हा संचालकमंडळानेही सर्वानुमते मंजुरी देण्यात आली, व साधारण सभेत एकमुखी पाठिंबा देण्यात आला तेंव्हाच दादांनी मान्यता दिली. त्यांच्या अगोदर सातारा, सांगली, जिल्ह्यातील कारखान्याने नामविस्तार केला होता. उदा. शेतकरी सांगलीचे वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, वाळवा तालुका सहकारी साखर कारखान्याचे राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना व त्याच पद्धतीने श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर असे नांव बदलले. कारण आज जे वारणानगर दिसते त्याची सर्व कल्पना तात्यासाहेबांचीच होती, वारणा म्हणजे तात्या आणि तात्या म्हणजे वारणा असे समीकरण झाले होते.

सर्वसामान्य सभासदाला कारखान्यात किती सुधारणा झाल्या, कोणत्या पद्धतीने झाल्या यांच्यापेक्षा आपण कारखान्याला पुरवठा केलेल्या ऊसाला दर काय दिला हा प्रश्न त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो. वारणा सहकारी साखर कारखान्याने आत्तापर्यंत देशपातळीवर प्रथम क्रमांकाचे दर दिले होते. त्यामुळे तात्यांच्या पाश्चात्य ऊसाला दर किती मिळेल असा प्रश्न सर्वसामान्य सभासदांना पडला होता. "१९९३-९४ या हंगामातील कारखान्याच्या ऊसाचा अंतिम भाव प्रतिटनाला रूपये ९७० + २५ रूपये खोडवी असा रूपये ९९५ प्रतिटनास देण्यात आला. हा भाव कारखान्याच्या आजवरच्या इतिहासात उच्चांकी भाव आहे."[१२] संपूर्ण वारणा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तात्यांच्या कार्याला खरा वारसदार म्हणून दादांची गणना होऊ लागली. वारणा विविध उद्योग व शिक्षण समुहाचे २१ व्या शतकांत योगदान असावे. त्यासाठी वारणा खोऱ्याची साजेशी नवनिर्मिती व्हावी त्याकरिता शेती आणि या परिसरांतील उद्योगधंद्यात नविन तंत्रज्ञान अंमलात यावे. त्यांचे स्वप्ने उराशी बाळगून कारखान्याचे चेअरमन आणि

वारणा दूध संघाचे व्हाईस चेअरमन कृषी औद्योगिक क्रांतीचे प्रणेते अनपेक्षीतपणे ५ एप्रिल १९९५ रोजी विलासदादा कोरे आपणांतून निघून गेले. हा संपूर्ण वारणा परिसराला मोठा धक्का बसला. कारण १३ डिसेंबर १९९४ रोजी तात्यांचा महानिर्वाण झाला. त्यानंतर केवळ चार महिन्यातच दुसरा मोठा धक्का होता. आधुनिक तंत्रज्ञान व तत्त्वज्ञानाशी सांगड घालून वारणा परिसरात सुरू केलेली कामे अर्ध्यावरच सोडून दादा निघून गेले. वारणा परिसराच्या विकासाच्या दृष्टीने फार मोठे नुकसान झाले.

**विनय कोरे (सावकर) यांच्या नेतृत्त्वाचा उदय :-**

जून १९९४ मधील वारणा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूकीच्या निमित्ताने विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाचा उदय झाला. त्यावेळी त्याचे वय केवळ २२ वर्षांचे होते. वय जरी लहान असले तरी बलदंड शरीरयष्टी व आकर्षक व्यक्तीमत्व असल्यामुळे समोरील व्यक्तीवर मोठी छाप पडते. कार्यकर्ते हाताळण्याची उत्कृष्ठ क्षमता त्यांच्या अंगी असल्यामुळे संपूर्ण वारणा खोऱ्याचे नेतृत्त्व लवकरच सावकराच्या हाती येणार याची चाहुल त्या निवडणुकीच्या निमित्ताने लागली. १९९४ च्या साखर कारखान्याच्या निवडणुकीत संपूर्ण प्रचार यंत्रणा त्यांनी सांभाळली. पूर्ण भाग पिंजून काढला. जुन्या-जाणत्या कार्यकर्त्यांचा मान ठेवून नवीन कार्यकर्त्यांची जुळवाजुळव करून संपूर्ण पॅनेल मोठ्या फरकाने विजयी झाले. विलास कोरे कारखान्याचे चेअरमन झाल्यानंतर सर्वांच्या अनुमतीने कारखान्याचे तज्ञ संचालक म्हणून त्यांची निवड करण्यात आली. या संचालक पदाच्या निमित्ताने त्यांचा वारणेच्या प्रशासनात प्रत्यक्ष संबंध आला. त्याच काळात साखर कारखान्याच्या आर्थिक उलाढाली एवढीच दुसरी मोठी संस्था म्हणजे वारणा दुध संघ या संघाच्या २०-७-१९९४ पासून स्विकृत तज्ज्ञ संचालक म्हणून निवड करण्यात आली. कारखाना आणि दुध संघ यासारख्या संस्थेचे तज्ज्ञ संचालक

झाल्यामुळे तसेच तात्यांच्या कार्याचा फार मोठा वारसा असल्यामुळे वारणा खोऱ्यात एका नव्या उमद्या नेतृत्त्वाचा उदय झाला.

१९५४ साली तात्यांनी साखर कारखान्याला मंजुरी मिळाल्यानंतर साखर कारखाना उभा केला. कारखान्याच्या आर्थिक मदतीवर इतर उद्योगांची स्थापना केली, तसेच शैक्षणिक संकुल उभे केले. या सहकाराच्या आर्थिक ताकदीवर अनेक पदे तात्यांना मिळाली असती. परंतु तात्यांनी राजकारणात भाग घेतला नाही. त्याच पद्धतीने विलासदादांचाही स्वभाव राजकारणी नव्हता. पण या दोघांच्यापेक्षा वेगळे नेतृत्त्व विनय कोरे यांच्याकडे आहे हे दिसून आले. वारणा विविध उद्योग, तसेच शिक्षण संस्थेच्या निमित्ताने अनेक कार्यकर्त्यांचा संपर्क येऊ लागला. १९५४ ची आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि १९९५ ची परिस्थिती यात फार मोठा फरक पडला होता. राजकारण हे तळागाळापर्यंत पोहोचले होते. सामान्य लोकांचाही राजकीय सहभाग वाढला होता. त्यात वारणा म्हणजे सधन भाग १९८७ नंतर वारणा नदीवर चांदोली धरण बांधले गेले. त्यामुळे वारणा नदी बारमाही पाणी देऊ लागली. अनेक पाणीपुरवठा योजना कारखान्याने राबविल्या. वाहतुक दळण-वळणाची सोय झाली. या सर्वांचा परिणाम म्हणून सर्वसामान्य जनतेची आर्थिक स्थिती सुधारली, अनेक नवनवीन साधने जनतेला मिळू लागली. जमिनीला पाणी पुरवठा होऊ लागल्यामुळे पैसे मिळवून देणारी पिके शेतकरी करू लागला. आर्थिक परिस्थिती आणि राजकारण यांचा जवळचा संबंध असल्यामुळे त्या कार्यकर्त्यांचा संच तयार झाला. अनेक सत्ता हाती असल्यामुळे त्या कार्यकर्त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. याचा अर्थ असा नाही की, तात्यांच्याजवळ कार्यकर्ते नव्हते. तात्यांच्याजवळ असाच कार्यकर्त्यांचा संच होता; पण वारणानगरच्या सर्व संस्था अनेक अडचणीतून निर्माण केल्या होत्या. त्यांचा विस्तार करणे गरजेचे होते. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तात्यांचा राजकारण हा स्वभावच नव्हता. त्यांना

सहकाराची अधिक आवड होती. आणि दुसरी गोष्ट म्हणजे वारणा भागातील कार्यकर्त्यांना तसेच जनतेला बदल आवश्यक होता. तात्यांचे पारंपारिक विरोधक आमदार यशवंत एकनाथ पाटील यांच्याकडे सर्व राजकीय सत्ता हाती होती. उदा. आमदारकी, पंचायत समिती, बऱ्याच ग्रामपंचायती, सेवा सोसायट्या, जिल्हा बँक प्रतिनिधी अशी राजकीय सत्ता वारणेच्या विरोधात होती. त्यामुळे शासनदरबारी परिसरातील समस्या जाणून घेण्यासाठी आमदारकी वारणेच्या नेतृत्त्वाला मिळणे गरजेचे होते.

**१९९५ ची विधानसभा निवडणूक :-**

महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, बरेच राजकीय नेते हे सहकाराच्या माध्यमातून पुढे आलेले आहेत. एखाद्या व्यक्तीने सहकारी साखर कारखाना आणि त्यातून इतर संस्था उभ्या केल्यानंतर त्याच्या जोरावर अधिक सामर्थ्य वाढविले आणि त्यातून राजकीय सत्ता मिळवली आहे. त्यातूनच सहकाराला राजकीय आदर्श मिळू लागला. आज महाराष्ट्रात विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात ज्या व्यक्तीकडे साखर कारखाना आहे. त्यांनी कारखान्याच्या माध्यमातून आपल्या भागाचा विकास केला आहे. त्यातून आपली राजकीय सत्ता वाढविली आहे. सहकाराच्या आर्थिक सामर्थ्यावर संपूर्ण जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व ठेवता येते असा अनुभव पहावयास मिळतो. उदा. सोलापूर जिल्ह्यात सहकाराच्या माध्यमातून विजयसिंह मोहिते-पाटील यांनी संपूर्ण जिल्ह्यावर आपली पकड बसविली आहे, साताऱ्यात छत्रपती अभयसिंहराजे भोसले आणि कराडचे विलासराव पाटील-उंडाळकर यांचे जिल्ह्यावर वर्चस्व कोणाचे याबाबत वाद आहे. सांगलीत वसंतदादांचे घराणे म्हणजे प्रकाशबाबू कै. विष्णू अण्णा पाटील, मदन पाटील तसेच वाळव्याचे जयंतराव पाटील, शिक्षण क्षेत्रात काम करणारे आणि नंतर सहकारातही भरीव कामे केलेले डॉ. पतंगराव कदम यांच्यात नेतृत्त्व कोणाकडे याबाबत सतत स्पर्धा असते. त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यात आवाडे

पिता-पुत्र, कै. रत्नाप्पाण्णा कुंभार गट, महाडीक, पी. एन. पाटील तसेच सदाशिवराव मंडलिक, चंदगडचे नरसिंग गुरूनाथ पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून आपली सत्ता भक्कम केली आहे. जनतेनेही त्यास साथ दिली. कारण सहकाराच्या माध्यमातून सामान्य सभासदाचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. सहकारातून समाजाचा विकास आणि आपलाही राजकीय विकास असा आलेखीत नियम झाला आहे.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या हाती असणाऱ्या संस्था, त्यातून आर्थिक सामर्थ्य, कार्यकर्त्यांचा संच, जनतेची इच्छा या सर्व गोष्टीतून तसेच स्वत:ची राजकारण करण्याची इच्छा या सर्वातून वारणेच्या नेतृत्त्वाने सार्वजनीक राजकारणात भाग घेतला. तो १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत विनय कोरे यांचे वय वर्ष २५ पूर्ण नसल्यामुळे त्यांना विधानसभा निवडणूकीत उभे राहता आले नाही. (ज्या व्यक्तीचे वय वर्ष २५ पूर्ण झालेले नाही अशा व्यक्तींना विधानसभा, लोकसभा निवडणुका लढवता येत नाही अशी कायदेशीर तरतूद आहे.) म्हणून निपुन विलासराव कोरे हे विधानसभेच्या निवडणुकीला उभे राहिले. काँग्रेस पक्षाची उमेदवारी आमदार यशवंत पाटील यांनाच दिली, शिवसेना उमेदवार म्हणून अशोक शंकर पाटील आणि अपक्ष उमेदवार निपुन कोरे या तीन प्रमुख उमेदवारात निवडणूक लढली गेली. वरील दोन्ही उमेदवार अधिकृत पक्षाचे हाते आणि कोरे हे अपक्ष होते. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार आमदार यशवंत पाटील यांनी विजय मिळविला. परंतु अपक्ष उमेदवार निपुन कोरे यांनी चांगली लढत दिली. शिवसेना उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर गेले. या निवडणुकीत निपुन कोरे पराभूत झाले तरीसुद्धा वारणा विविध उद्योग समुहाच्या जोरावर त्यांनी पाटील यांना एकतर्फी विजय होऊ दिले नाही. ही निवडणूक कोरे घराण्यामार्फत प्रथमच लढली गेली होती. या निवडणुकीतील पराभव हा पुढील निवडणुकीची नांदीच ठरला. तेथून पुढे वारणेच्या नेतृत्वाने सातत्याने सार्वजनिक राजकारणात भाग घेतला. बेरजेचे राजकारण करण्यास

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सुरूवात केली. अनेक कार्यकर्ते आपल्याकडे वळवण्यास विनय कोरे यांनी सुरूवात केली. वारणा विविध उद्योगाच्या अनेक संस्था ताब्यात असल्यामुळे जवळच्या विश्वासू कार्यकर्त्यांना कोणत्या-ना-कोणत्या संस्थेत समावेश करून घेता आले. त्यामुळे विश्वासू कार्यकर्त्यांचा गट प्रत्येक गावात तयार झाला. मार्च १९९५ च्या निवडणूका संपल्या आणि ५ एप्रिल १९९५ रोजी विलासदादांचे अनपेक्षितरित्या निघून जाणे हे सर्वांच्या दृष्टीने वाईट गोष्ट होती.

विलास दादांच्या नंतर वारणा साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी श्रीमती सावित्रीबाई विश्वनाथ कोरे (आक्का) यांची निवड सर्व संचालकांनी केली. आक्कांची निवड म्हणजे तात्यासाहेब कोरे यांच्या कुटुंबावर संपूर्ण संचालक आणि सभासद यांनी टाकलेला विश्वास होता. वास्तविक कारखान्याचे उपाध्यक्ष बाजीराव बाळाजी पाटील यांचे अध्यक्षपदी निवड होईल असे वाटत होती. जर पाटील हे अध्यक्ष झाले असते तर वारणेच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळाली असती. पण ते न होता वारणेच्या अध्यक्षपदी सावित्रीबाई कोरे यांचीच निवड झाली. आणि विनय कोरे यांनी संपूर्ण कारभार हाती घेतला. आक्का अध्यक्ष असल्या तरी सर्व कारभार हा विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखालीच चालतो. विलासदादांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर विनय कोरे बिनविरोध कारखान्याचे संचालक झाले. १९९५ नंतर विनय कोरे यांनी संपूर्ण वारणेचे नेतृत्त्व आपल्या हाती घेतले. संपूर्ण कारभार हा तात्यासाहेब कोरे यांचे आदर्श समोर ठेवून चालत आहे. तसेच विलासदादांच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञानाचाही उपयोग वारणेमध्ये करत आहेत.

**विनय कोरे (सावकर) यांचे संपूर्ण वारणा खोऱ्याचे नेतृत्त्व :-**

१९९५ नंतर विनय कोरे यांनी संपूर्ण वारणा खोऱ्याचे नेतृत्त्व केले आहे. या त्यांच्या नेतृत्त्वात सहकार आणि राजकारण अशा दोन्ही क्षेत्रात काम केले आहे.

महाराष्ट्रात इतरत्र सहकाराच्या माध्यमातून राजकारणावर आपली पकड कशी घट्ट केलेली आहे, याच पद्धतीने विनय कोरे यांनीही राजकारणात भरीव यश मिळविले आहे. १९९५ ते मे २००१ पर्यंतच्या विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, तात्यासाहेब कोरे यांनी विविध उद्योग व शैक्षणिक संकुल उभे केले असल्यामुळे तसेच ते पूर्णपणे राजकारणापासून अलिप्त होते. अशा कोरे घराण्यातील राजकारणाची कोरी पाटी असल्यामुळे विनय कोरे यांना अल्पावधीतच राजकारणात चांगले यश मिळविले आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विविध उद्योगामध्ये अनेक कार्यकर्त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत, तसेच आर्थिक पाठबळही मिळाले आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे विरोधकांचे कोणतेही भरीव कार्य नाही. अनेक वर्ष आमदारकी सारखी सत्ता असून सुद्धा त्यांनी पन्हाळा- बावडा मतदारसंघात कोणताही नवा उद्योग निर्माण केला नाही. आज संपूर्ण देशभर कोणता प्रश्न भेडसावत असेल तर नोकरीची समस्या, आज कोणतेही सरकार आले तर सर्वांनाच नोकऱ्या देऊ शकणार नाही. तसेच कोणीही आमदार झाले खासदार झाले तरी सर्वांच नोकऱ्या मिळू शकणार नाहीत, लोकसंख्याच फार झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत वारणा विविध उद्योगाने अनेक सर्वसामान्य जनतेच्या हाताला काम दिले आहे. त्यामुळे काही प्रमाणात नोकरीची समस्या सुटण्यास मदत झाली आहे. या सर्वांचा परिणाम होऊन विनय कारे यांना राजकारणात यश आले आहे.

तात्यासाहेब कोरे यांचे संकल्प आणि वारसा यांचा अभ्यास करताना विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाचे दोन विभागात वर्गीकरण करावे लागते. त्यापैकी पहिला भाग म्हणजे सहकार आणि दुसरा राजकारण. सहकारातील काम म्हणजेच तात्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम विनय कोरे यांनी केले आहे.

**तात्यांचा सहकारातील वारसा :-**

विनय कोरे (सावकर) यांनी सहकारात काम करत असताना तात्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम त्यांनी केले आहे. वारणा सहकारी साखर कारखान्याचा नामविस्तार होऊन श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर असे झाले. "१९९५-९६ या गळित हंगामात कारखान्याने सरासरी ऊस उत्पादनांमध्ये हेक्टरी ९५.५४० मे. टन ऊसाचा अंतिम भाग प्रति टनास रूपये ८५१ (खोडकीसह) इतका दिलेला आहे. अंतिम ऊस दरापोटी खोडकीसह रोखीने द्याव्या लागणाऱ्या या संपूर्ण ऊस बिलाच्या रक्कमचे वाटप संपूर्ण देशात प्रथम आपल्या कारखान्याने केले आहे."[११] तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली कारखान्याने देशपातळीवरील अनेक पारितोषिके मिळविली होती. तसाच वारसा विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली पुढे चालविला. "कारखान्यास दिनांक २६/१२/९६ रोजी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाकडून तत्कालीन पंतप्रधान मा. एच. डी. देवेगौडा यांचे शुभहस्ते 'हाय रिकव्हरी झोन' विभागामध्ये देश पातळीवर प्रथम क्रमांकाचे ऊस विकासासाठीचे पारितोषिक मिळाले आहे."[१४] वारणा साखर कारखान्याने ग्रामीण विकासात मोठे कार्य केले आहे. तात्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश हा ग्रामीण विकासच होता. यांची अनेक संस्थांनी दखल घेतली आहे. म्हणून "दै. केसरी सांगली आवृत्तीच्या वर्धापन दिनानिमित्त दै. केसरीचे विश्वस्त व विधान सभेचे त्यावेळचे सभापती मा. श्री जयवंतराव टिळक यांच्या शुभहस्ते ग्रामीण भागातील उत्कृष्ट सामाजिक कार्य करणारा 'सहकार उद्योग समूह' म्हणून वारणा विविध उद्योगास देण्यात आले."[१५]

सर्वसामान्य सभासदाला कारखाना आपल्या पुरवठा केलेल्या ऊसाला मोबदला किती मिळेल यातच त्याचे समाधान असते. वारणा सहकारी साखर कारखान्याचे आपल्या उच्च दराची परंपरा कायम ठेवली आहे. १९९६-९७ या गळीत हंगामाचा

अंतिम भाव प्रति टनास ९९० रूपये (खोडक्यासह) इतका मिळाला आहे. त्याशिवाय उशिरा गाळप केलेल्या ऊसास कारखान्याने ७१.१४ लक्ष रूपये अनुदान दिले आहे. सरासरी साखर उतारा १२.७१ इतका मिळाला. तसेच ऊस उत्पादनामध्ये हेक्टरी ८०.७९० मे. टन उत्पादन होऊन पहिला क्रमांक मिळविला आहे

१९९६-९७ या वर्षात तात्यासाहेबांचे सहकारशिल्प नाशिकच्या मदन गर्गे यांनी दीड वर्षे मेहनत घेऊन तयार केलेले तात्यासाहेब कोरे यांचे पंचधातूचे शिल्प (पुतळा) तत्कालीन मुख्यमंत्री नामदार मनोहर जोशी यांनी अनावरण करताना म्हटले. "तात्यासाहेबांच्या कर्तृत्त्वाचा चालता-बोलता इतिहास आहे. आम्ही राजकारणी लोक केवळ बोलतो पण तात्यासाहेबांसारखी माणसं प्रत्यक्ष कार्य करून राहतात. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मी जे स्वप्न पाहतो ते इथे प्रकट झालेलं आहे."[१६] वारणा सहकारी साखर कारखान्याने आजवर केलेल्या कार्याबद्दल अनेक राष्ट्रीय पातळीवरचे पुरस्कारमिळाले आहेत. तात्यासाहेबांचा वारसा पुढे कारखान्यास मिळवून दिला आहे. वारणा सहकारी साखर कारखाना आणि कोणत्याही क्षेत्रातील प्रथम पुरस्कार असे समीकरण बनले आहे. १९९७-९८ या वर्षात कारखान्यास अनेक राज्य, राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यामुळे कारखान्याची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. वारणा खोऱ्यात आजवर केलेल्या कामाची अनक संस्थाने दखल घेऊन पारितोषिके देण्यात आली. अनेक निकषाला हा कारखाना प्राप्त ठरला आहे. त्यातून विनय कोरे यांचे नेतृत्त्व उजाळून निघाले आहे. वारणा सहकारी साखर कारखान्यास १९९७ नंतर अनेक पुरस्कार मिळाले ते पुढीलप्रमाणे,

**भारतीय उद्योगरत्न पुरस्कार :-**

"वारणानगरच्या श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखान्यास आत्तापर्यंत साखर उतारा, तांत्रिक कार्यक्षमता व ऊस विकास व परिसर या

क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल भारतीय उद्योगरत्न पुरस्कार जाहीर झाला असून नवी दिल्लीच्या भारतीय आर्थिक विकास व संशोधन संस्थेकडून अधिकृत पत्र आले आहे.''[१७] वरील पुरस्काराशिवाय आणखी काही पुरस्कार १९९८ मध्ये मिळाले. ''वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यांचे महाराष्ट्रात दक्षिण विभागातील उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमतेचे प्रथक क्रमांकाचे पारितोषिक, याच संस्थेमार्फत Most Immovative Factory(सर्वोत्तम उद्योजकता पुरस्कार) हा पुरस्कार संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व झोनमधील एकमेव पुरस्कार. ज्यापद्धतीने वारणा सहकारी साखर कारखान्याला पुरस्कार मिळाला तसाच वारणा विविध उद्योग समुहाचे नेते मा. विनय कोरे यांना बेस्ट इन्टरप्रेनर (सवोत्कृष्ठ उद्योजक) म्हणून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट या संस्थेमार्फत एकमेव पुरस्कार देण्यात आला.''[१८] महाराष्ट्रात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ही साखर उद्योगात फार महत्त्वाची संस्था आहे. प्रत्येक वर्षी साखर कारखान्याने विविध क्षेत्रात केलेल्या कायाबद्दल पुरस्कार देण्यात येतात. महाराष्ट्राच्या राजकारणावरही या संस्थेचा चांगला दबदबा आहे. प्रत्येक सहकारी साखर कारखाना या संस्थेचा संदस्य आहे. तसेच साखर कारखान्याच्या सामर्थ्यावर अनेक व्यक्ती महाराष्ट्राच्या राजकारणावर आपला प्रभाव पाडत आहेत.

सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरीबद्दल वारणा सहकारी उद्योग समूहास ''इन्स्टिट्यूट ऑफ मार्केटिंग मॅनेजमेंट आणि टॉप मॅनेजमेंट क्लब यांच्या वतीने 'उत्कृष्ठ सहकारी उद्योग समूह' हा पुरसकार देण्यात आला. सहकार क्षेत्रातील महाराष्ट्रातील हा एकमेव पुरस्कार आहे.''[१९] वारणा सहकारी साखर कारखान्याला तात्यासाहेब कोरे, विलासदादा आणि विनय कोरे यांचे नेतृत्त्व लाभले या सर्वांच्या कुशल नेतृत्त्वाखाली कारखान्याला अनेक राष्ट्रीय पातळीवरचे पुरस्कार मिळाले आहेत. पण या सर्व पुरस्कारामध्ये सर्वांत महत्त्वाचा पुरस्कार १९९९ मध्ये मिळाला. त्यामुळे कारखान्याच्या उत्पादनाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. तो पुरस्कार म्हणजे ''आय. एस. ओ.

९००२. त्यामुळे कारखान्याच्या शिरपेचामध्ये आणखी एक मानाचा तुरा खोचला गेला.'आय. एस. ओ ९००२' हे आंतरराष्ट्रीय गुणवत्ता नामांकन मिळविणारा तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना देशातील पहिला कारखाना आहे. टि. यु. व्ही बायर्न जर्मनी या कंपनीचे विशेष प्रतिनिधी व लेखा परीक्षक अतुल पी. कुलकर्णी, मथुरेश सारंग, कौस्तुभ कोरडे, पी. एन. जैन, विजय शिंदे यांनी वारणा कारखान्यास आय. एस. ओ ९००२ या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता मानांकनास शिफारस केली.''[१०] एक वर्षी सातत्याने अनेक निकश लावून कारखान्याच्या आजवरच्या दैदिप्यमान कारकिर्दीचा आढावा घेऊन हा पुरस्कार दिला आहे.

तात्यासाहेब कोरे यांनी ज्या पद्धतीने कारखान्याचे आणि संपूर्ण वारणा उद्योग समुहाचे नेतृत्त्व केले त्याच पद्धतीने विनय कोरे यांनी तात्यांचा वारस पुढे चालविण्याचे काम केले आहे. म्हणूनच कारखान्यास अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. १९९७ -९८ व १९९८-९९ या हंगामाचा अंतिम दरही ११०० रूपये व ९०१ रूपये असा दिला आहे. कारखान्याची गाळप क्षमता वाढल्यामुळे कारखान्याचे कार्यक्षेत्रातही वाढ करण्यात आली. आज वारणा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ८३ गावे येतात. एकूण सभासद १९५१९ इतके आहेत. वारणा कारखाना म्हणजे वारणा विविध उद्योगाचे पालकत्त्व आहे. विनय कोरे यांनी कारखान्याचे नेतृत्त्व उत्कृष्ठ पद्धतीने केले आहे.

कै. तात्यासाहेब कोरे हे सहकारातील युगपुरूष होते. त्यांच्यात आशीर्वादाने त्यांचे नातू मा. विनय कोरे हे गेली ५ वर्षे हा संपूर्ण वारणा सहकारी उद्योग व शिक्षण समूह चालवित आहेत. नव्या युगाच्या जाणिवा व जुन्यातील सत्त्व यांचा अंगिकार करून उज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल. संपूर्ण वारणा खोऱ्याने त्यांच्या नेतृत्त्वावर पूर्ण विश्वास टाकला आहे. "२६/५/१९९९ रोजी तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर

कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखालील पॅनेलने १२९०० इतक्या उच्चांकी मताधिक्क्याने संपूर्ण पॅनेल निवडून आले.''[२१]

तात्यासाहेबांचा वारस म्हणून विनय कोरे यांनी ज्या पद्धतीने वारणा सहकारी साखर कारखान्याचे नेतृत्त्व केले त्याच पद्धतीने वारणेच्या विविध उद्योगांचेही नेतृत्त्व केले आहे. त्यामध्ये २० जुलै १९६८ साली शेती व्यवसायाला पुरक किंवा जोडव्यवसाय म्हणून दुग्ध प्रकल्प स्थापन केला. सुरूवातीच्या काळात हा दुध संघ केवळ दुध संकलन करून शासकीय संस्थांना दूध पुरवठा करीत होता. त्याकाळात अनेक अडचणी येऊन हा दुध संघ बंद पडण्याच्या मार्गावर होता. पण १९८१ नंतर मुंबई येथे दुध विक्री आणि दुधापासून इतर उपपदार्थांना सुरूवात केल्यावर हा दुध संघ प्रगती पथावर आला आहे. वारणा दूध संघ १९६८ साली स्थापन झाला. त्यावेळी प्रतिदिनी १९५० लिटर दूध संकलन होत होते. पण आज हाच दूध संघ २ लाख २५ हजार लिटर दूध संकलित करत आहे. त्यापैकी मुंबईत दररोज सव्वा लाख लिटर दुध विक्री केली जाते. शिवाय स्थानिक बाजारपेठेमध्येही मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. वारणा सहकारी दूध संघाचे सध्या वारणा तूप, वारणा लस्सी, दूध पावडर, श्रीखंड, टेबल बटर, स्टॅमिना, चीज इ. दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ लोकप्रिय ठरले आहेत. वारणा स्टॅमिनाचे माल्टेड फूड उत्पादन करून बाजारपेठेत विक्रीला उतरल्याबरोबर पहिल्याच वर्षी वारणादूध संघाने त्याचा भारतीय लष्करासाठी ५५० टन इतका पुरवठाही यशस्वीरित्या केला आहे.

सन १९९६ पासून विनय कोरे (सावकर) हे वारणा दूध संघाचे चेअरमन आहेत. त्यांच्या कुशल नेतृत्त्वाखाली दूध संघाच्या १९९५-२००० दोन निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत. या दोन्ही निवडणुकीत विनय कोरे यांच्या नेतृत्त्वावर संपूर्ण कार्यक्षेत्रातील १५४८५ सभासदांनी पूर्ण विश्वास टाकला. शेतीला जोडधंदा म्हणून दूधव्यवसाय तात्यासाहेब कोरे यांनी सुरू केला. तसे विलासदादांच्या विज्ञान, तंत्रज्ञानाचा

वापर करून वारणा दूध संघाचे अनेक मानांकित पुरस्कार प्राप्त केले आहेत. १९९७-९८ मध्ये, २०३५ टन श्रीखंडाची उत्पादन व विक्री करून एक नवा राष्ट्रीय उच्चांक प्रस्थापित केला आहे. ज्यावेळी वारणा दूध संघाने १९८२-८३ मध्ये दिवसा २० ते ३० किलो याप्रमाणे वारणा श्रीखंडाच्या उत्पादनास सुरूवात आणि आज प्रतिदिनी सरासरी सात टनाहून जादा श्रीखंडाचे उत्पादन होते.

"वारणा दूध संघास आय. एस. ओ. ९००२ हे प्रमाणपत्र आंतरराष्ट्रीय कंपनीकडून मिळाले आहे. दूध संघामार्फत चाललेल्या एकंदरीत कामकाजाबाबात आंतरराष्ट्रीय दर्जाचे निकष व नियमांचे पालन होते का, व ते कायमस्वरूपी राबविले जातात का, या गोष्टींचा आंतरराष्ट्रीय कंपनीच्या प्रतिनिधींकडून पाहणी होऊन हे प्रमाण दिले जाते. दूध संघास टी. यू. व्ही. ऱ्हिन लॅन्ड या जर्मनी आंतरराष्ट्रीय कंपनीकडून सदर प्रमाणपत्र मिळाले."[२२] हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी वारणा दूध संघाचे अध्यक्ष विनय कोरे यांचे संपूर्ण संचालक मंडळ, दूध संघाचे कार्यकारी संचालक चित्रसेन गुळवे व त्यांचा संपूर्ण स्टाफ तसेच वारणा दूध संघाचे सर्व उत्पादक यांच्या संयुक्त कामगिरीमुळे मिळाला आहे.

वारणा सहकारी साखर कारखाना आणि वारणा दूध संघ या दोन संस्थांबरोबर इतर संस्थात विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली तात्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम केले. ग्रामीण भागात व इतर व्यवसायांना मोठे आर्थिक साहाय्य देणारी बँक म्हणजे वारणा सहकारी बँक होय. १९९५-९६ पासून विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली निपुन कोरे हे बँकेचा कारभार चालवित आहेत. १९९६-९७ ते २००१ बँके ची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली आहे. बँकेचा कारभार २१ शाखांच्या माध्यमातून चालू आहे. ग्रामीण आणि शहरी भागात या बँकेच्या शाखा आहेत. तात्यासाहेब कोरे व विलास दादा यांच्या अथक प्रयत्नांमुळे श्री वारणा ॲग्रीकल्चर गुडस

प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी 'वॅप्कॉस' या संस्थेची स्थापना केली. वारणा परिसरात एक प्रक्रिया प्रकल्प उभा करणे हा तात्यांचा एक संकल्प होता. त्यासाठी त्यांनी तसे प्रयत्नही केले पण त्यांच्या हयातीत तो पूर्ण होवू शकला नाही. तसेच विलासदादांनी अनेक तंत्रज्ञानाचा वापर करून तसेच १००% निर्यात करण्यासाठी अमेरिका, हॉलंड या देशाशी करार केले पण त्यांच्या अनपेक्षित जाण्याने तो लवकर पूर्ण होऊ शकला नाही. त्यानंतर वारणेचे नेतृत्त्व करणारे विनय कोरे यांनी २३/१०/१९९८ रोजी हा प्रकल्प सुरू केला. केळी, आंबा, पपई, टोमॅटो, मिरची इत्यादी फळांचा पल्प हॉलंड, व अमेरिका येथे पाठविण्यात आला. आणि तात्यांचा संकल्प पूर्ण केला. पण पहिल्या वर्षात केवळ १४१ दिवस हा प्रकल्प चालविला. पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार फळांचे उत्पादन मिळत नाही. संपूर्ण महाराष्ट्रभर व इतर राज्यातून सदरची फळे खरेदी करावी लागतात. त्यामुळे होणारा खर्च व मिळणारी रक्कम यात काही वेळा फरक पडतो. त्यामुळे हा प्रकल्प कठीण आर्थिक अडचणीतून जातो आहे. या सर्वांवर उपाय म्हणून तात्यासाहेब यांनी सांगितले, शेतीचे धोरण अवलंबले पाहिजे. १/३ ऊस पिकासाठी, १/३ फळे व भाजीपाला व १/३ धान्य पिकासाठी अशा पद्धतीने शेतकऱ्याने आपल्या शेतीचे विभाजन केले तर निश्चीतच शेतकऱ्यांना फायदा होईल व फळ प्रक्रियाकरण कारखाना चालू शकेल.

सदर संस्थेची सन १९९९ ते २००४ या पाच वर्षासाठी संचालक मंडळ बिनविरोध निवडून आले आहे. वारणा विविध उद्योग समूहाचे नेते. मा. विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली २६ संचालक बिनविरोध निवडून येऊन विनय कोरे हे चेअरमन आहेत. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी संचालक मंडळाला मोठे आव्हान आहे, त्यासाठी वारणा परिसरातील शेतकऱ्यांनी फळबागा करणे आवश्यक आहे. तरच हा

प्रकल्प यशस्वी होऊ शकेल. हा प्रकल्प यशस्वीपणे व पूर्ण काळ चालविणे हे विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाची कसब ठरणार आहे.

**वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्प :-**

वारणा विविध उद्योग व शैक्षणिक संकुल तात्यांच्या अविरत परिश्रमाने उभे राहिले. प्रत्येक उद्योग हा भारतात एक आदर्श नमुना म्हणून ठरला गेला आहे. तात्यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेला प्रत्येक उद्योग तात्यांनी घालून दिलेला आदर्श पुढे ठेवून चालविण्याचे काम त्यांचे नातू विनय कोरे करत आहेत. जुन्या संस्था तर चांगल्या पद्धतीने चालविल्या आहेतच त्याचबरोबर तात्यांचे विलास दादांचे काही संकल्प पूर्ण करण्याचे काम विनय कोरे यांनी केले आहे. शिवाय नवीन प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा म्हणजे वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्प हा होय. आजचे युग हे संगणक युग आहे. या संगणक युगात संपूर्ण जग जवळ आले आहे. परदेशात घडलेली एखादी गोष्ट काही क्षणातच आपल्याजवळ येते. त्याची माहिती मिळते. आज आपल्या देशात मोठमोठ्या बँकेत, रेल्वेत, अनेक शहरात हे माहिती तंत्रज्ञान आले आहे. पण ग्रामीण भागात त्यांचा फारसा प्रसार झालेला नाही. त्यामुळे सामान्य जनतेला या तंत्रज्ञान युगात जगाबरोबर आणण्याचे काम भारत सरकार सातत्याने प्रयत्न करत होते. १९९० पर्यंत ज्या व्यक्तीला लिहिता-वाचता येते तो साक्षर असे आपण ढोबळमानाने मानत होता. पण १९९० नंतर या साक्षरतेची व्याख्या हळूहळू बदलू लागली आहे. २१ व्या शतकात ज्या व्यक्तीला संगणक व माहिती तंत्रज्ञान यांची माहिती असणाऱ्या व्यक्तीच साक्षर म्हणून गणल्या जाणार आहेत. अशा परिस्थितीत २१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी तसेच संपूर्ण जगाच्या वेगाने आपणही जाणे गरजेचे आहे. तरच जगाच्या स्पर्धेत आपण टिकून राहू. यासाठी वारणा परिसरातील जनतेलाही संगणक आणि स्पर्धेत टिकण्याची गरज आहे. हे मा. विनय कोरे यांनी ओळखेले, मा.

SHIVAJI UNIVE LIBRARY KOLHAPUR

तात्यासाहेब कोरे यांचा सहकाराचा वारसा आणि विलासदादांचा विज्ञान आणि तंत्रज्ञान वापरण्याचा वारसा विनय कोरे यांनी पुढे चालविला आहे. तसेच संपूर्ण देशात एक आदर्श ग्रामीण उद्योग समूह म्हणून वारणेचा अनेक वेळा मानसन्मान देऊन गौरव केला आहे. अनेक पारितोषिके मिळाले आहेत. वारणेचे मुख्य उद्दीष्ठ ग्रामीण विकास हे आहे. त्यामुळे संपूर्ण देशात ग्रामीण क्षेत्रात काम करणारा सहकारी उद्योग समूह म्हणून गणला आहे. अशावेळी भारतातील ग्रामीण क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान यांची माहिती होण्यासाठी केंद्र सरकार, राज्यसरकार यांच्या सहकाऱ्याने काही योजना हाती घेण्याचे ठरले. तेंव्हा देशात प्रथम वारणा उद्योग समूहाची निवड करण्यात आली. म्हणून वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्पाची निर्मिती केली आहे.

"मा. पंतप्रधान कार्यालयांतर्गत माहिती तंत्रज्ञान विकासासाठी नॅशनल टास्क फोर्स ऑन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी अॅन्ड सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट यांच्याकडून वारणानगर परिसराच्या ७० गावांमध्ये 'वायर्ड व्हिलेज' म्हणून हा प्रकल्प वारणानगर येथे सुरू केला आहे. संपूर्ण आशियामध्ये एकमेव असा २.५० कोटीचा हा प्रकल्प केंद्रशासन महाराष्ट्रशासन व वारणा उद्योग व शिक्षण समूह यांच्या संयुक्त सहभागाने सुरू झाला आहे."[२१] ग्रामीण भागातील संगणक माहिती तंत्रज्ञान यांच्या वापरास चालना मिळून ग्रामीण भागाचा विकास साधावा व ग्रामीण भागातील लोकांना सभासदांशी व परेदशीसुद्धा थेट संपर्क साधण्याचे एक प्रभावी साधन म्हणून हा प्रकल्प ओळखला जाणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत वारणा उद्योग व शिक्षण समूहातील ७० गांवे संगणकाद्वारे एकत्र जोडली आहेत. सर्व संगणक केंद्र वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असणाऱ्या प्रमुख केंद्राशी सार्वजनिक दूरध्वनीद्वारे (संगणकास) जोडली आहेत. त्यामुळे गावातील सर्व संगणकाचे मुख्य केंद्रातील संगणकाशी दळणवळण प्रस्थापित केले जाते. वारणानगर येथील मुख्य केंद्र हे इंटरनेटशी थेट उपग्रहाद्वारे

दळणवळण यंत्रणेद्वारे जोडले आहे. यासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील त्या त्या गावामधील सहकारी संस्थांनी संगणक केंद्राशी आवश्यक ती जागा, वीज व टेलिफोन इ. व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.

या वारणा वायर्ड व्हिलेज प्रकल्पामुळे श्री. वारणा उद्योग व शिक्षण समूहातील सर्व प्रकारची वैयक्तिक, सार्वजनिक, कृषीविषयक, शैक्षणीक व व्यवसायविषयक सर्व माहिती प्रत्येक गावामध्ये उपलब्ध झाली आहे. ऊसाची नोंद, ऊसाची रिकव्हरी, ऊस तोडणीची चिठ्ठी व माहिती, खत विक्री व येणे-देणे ऊस बिले, ऊसाचे वजन इत्यादी सर्वच माहिती मिळते. देशातील पिकांची माहिती, स्वयंरोजगार माहिती, गांव माहिती प्रमाणे कृषी उत्पन्नाची माहिती, दूध व्यवसायाची माहिती शैक्षणिक व व्यवसायविषयक माहिती मिळते. सर्वांच्या जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा जमिनीचा ७/१२ चा उताराही या संगणकाद्वारे आपणासर्वांना यापुढे मिळणार आहे. असा हा देशातील एकमेव प्रकल्प असून माननीय आमदार विनयराव कोरे यांच्या प्रयत्नाने वारणा विविध उद्योग व शैक्षणिक समूहास मिळाला आहे. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात वारणेने मोठी भरारी मारली आहे.

वारणा विविध उद्योगात ज्या पद्धतीने तात्यांचा आदर्श पुढे चालविण्याचे काम विनय कोरे यांनी केले. त्याच पद्धतीने शैक्षणिक क्षेत्रातही तात्यांचा वारसा चालविण्याचे काम करत आहे. तात्यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेली श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ - ही संस्था ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला सर्व सोयीने युक्त उपलब्ध आहे. या शिक्षण मंडळामार्फत कोल्हापूर जिल्ह्यातील एकमेव सैनिकी शाळा १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केली आहे. पाचवी, सहावी, सातवी असे तीन वर्ग सुरू आहेत. शिवाय नैसर्गिक वाढीने पुढील वर्ग सुरू होणार आहेत. सर्व इयत्तांचे निकाल १००% लागले आहेत. या सैनिकी शाळेत पाचवी ते सातवी अशी एकूण १४४

विद्यार्थी संख्या आहे. वारणा शिक्षण मंडळाने या शाळेत विद्यार्थी मर्यादित ठेवून गुणात्मक दर्जा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक संस्थांनी सैनिकी शाळा मंजूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु वारणा शिक्षण मंडळालाच फक्त मान्यता देण्यात आली. कारण ह्या मंडळाने ग्रामीण भागात आजवर केलेले काम हा निकष महत्त्वाचा ठरला. विनय कोरे यांनी ही शाळा आदर्श करण्यासाठी सर्वस्वी तयारी ठेवली आहे.

**विनय कोरे (सावकर) यांचे राजकीय क्षेत्रातील नेतृत्त्व :-**

सहकार आणि राजकारण यांचा फार जवळचा संबंध आहे. तात्यासाहेब कोरे यांनी सहकारात फार मोठे काम करून सुद्धा राजकारणात प्रवेश केला नाही. तात्यासाहेब कोरे हे म. गांधी विचाराचे होते, गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सामाजिक समता यांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. कोणतीही सामाजिक कार्ये कोणताही हेतू ठेवून करावयाचे नाही, असा गांधीजींचा संदेश होता. त्याच पद्धतीने तात्यासाहेब कोरे यांनी केवळ ग्रामीण विकासाच्या दृष्टीने वारणानगर येथे विविध उद्योग संस्था व शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. व्यक्तीगत स्वार्थासाठी कोणतीही संस्था स्थापन केली नाही. म्हणून वारणेचा प्रत्येक उद्योग यशस्वी झाला, त्यास तात्यासाहेबांचे कुशल नेतृत्त्व हे कारणीभूत आहे. तात्यासाहेब कोरे यांचे अनेक मित्र हे धुरंधर राजकारणी होते. उदा. यशवंतरावजी चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, आण्णासाहेब शिंदे, रत्नाप्पाण्णा कुंभार इत्यादी सहकारात कार्य करत होते त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्राचेही राजकारण करत होते. पण तात्यांनी कधीही राजकारणात भाग घेतला नाही. त्यांचे विचार हे काँग्रेस पक्षाशी मिळते-जुळते होते. परंतु त्यांनी सार्वत्रिक निवडणूकीत कधीही भाग घेतला नाही. अनेकवेळा काँग्रेस पक्षाने त्यांना आमदारकीचे तिकीट दिले होते. पण त्यांनी राजकारणापेक्षा सहकारात कार्य करणे पसंत केले आणि शेवटपर्यंत त्यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात परिवर्तन करण्याचे काम केले आहे.

ज्यावेळी तात्यांचा वारस म्हणून वारणेचे नेतृत्त्व विनय कोरे यांनी १९९५ साली हाती घेतले. त्यावेळी ते राजकारणात भाग घेतील का ? असा प्रश्न पडला, पण विनय कोरे यांनी सहकारात काम करत असताना राजकारणातही भाग घेतला, महाराष्ट्रात सहकार चळवळीची मोठी राजकीय शक्ती आहे. त्यात विशेषत: साखर कारखान्याची शक्ती ज्या व्यक्तीच्या मागे भक्कम आहे. त्या प्रत्येक व्यक्तीने सार्वजनिक राजकारणात भाग घेतला आहे. त्याच पद्धतीने विनय कोरे यांनीही सहकाराच्या माध्यमातून मिळालेली सत्ता यांचा वापर राजकारणात केला. आणि राजकारणापासून अलिप्त असणारा उद्योग समूह म्हणून वारणेची जी ख्याती होती ती दूर झाली. आणि संपूर्ण महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्याच्या आणि सहकाराच्या सामर्थ्यावर ज्या पद्धतीने राजकारणात अनेक मानाची पदे मिळविली आहेत. त्याच पद्धतीने विनय कोरे यांनी वारणेच्या विविध उद्योग समूहाच्या शक्तीवर कमी वयातच राजकारणात चांगले यश मिळविले आहे. विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाचा उदय खऱ्या अर्थाने १९९४ च्या वारणा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने झाला. या निवडणुकीत वारणा कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावांमध्ये त्यांचा संपर्क आला. त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची छाप पुढील व्यक्तीवर सहज पडते. कारण बलदंड शरीरयष्टी, आकर्षक व्यक्तिमत्व असल्यामुळे पुढील समूहावर त्याचा प्रभाव पडतो. १९९५ च्या विधानसभा निवडणूकीत त्यांचे वय बसले नाही. त्यामुळे आपल्या भावाची म्हणजेच निपुन कोरे यांची उमेदवारी पुढे करून, वारणा उद्योग समूहाच्या राजकीय शक्तीचा अंदाज घेतला. त्या निवडणूकीत निपुन कोरे पराभूत झाले. पण विनय कोरे यांनी त्याच दिवशी पुढच्या विधानसभेच्या निवडणूकीची तयारी केली. आणि कसल्याही परिस्थितीत (कोणतीही किंमत मोजून) आमदार होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. निवडणूकीत आर्थिक ताकद आणि विविध संस्थांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना राजकीय तसेच नोकरीसाठी सामाहून घेण्यास अनेक संस्था त्यांना उपयोगी पडल्या, की ज्या तात्यांनी त्यांचा कधीही राजकारणासाठी वापर केला नव्हता. पण १९९५ च्या

निवडणूकीत महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळाली. आणि प्रथमच विधानसभेवर भगवा फडकला. म्हणजेच शिवसेना-भाजपा याची युती अपक्षाच्या मदतीने सत्तारूढ झाली.

तात्यासाहेब कोरे हे कॉंग्रेस पक्षाच्या विचारसरणीचे होते. त्यांनी कधीही निवडणूक लढविल नाही. परंतु कधीही कॉंग्रेस पक्ष सोडला नाही. तात्यासाहेबांच्या काळात १९५४ ते १९९४ पर्यंत महाराष्ट्रात कॉंग्रेसचेच वर्चस्व होते. पण विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाचा वारणा खोऱ्यात उदय झाला आणि महाराष्ट्रात युतीची सत्ता आली. त्यामूळे त्यांनी १९९५ ते १९९९ पर्यंत उघडपणे कोणत्याही पक्षाचे समर्थन केले नाही. राज्यात शिवसेना-भाजपा सत्तेवर असल्यामुळे त्यांनी युती शासनाशी मिळते-जुळते धोरण घेतले. अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने मुख्यमंत्री मनोहर जोशी, उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे, तत्कालीन ग्रामविकासमंत्री आण्णा डांगे यांचा सातत्याने वारणा उद्योगाशी संपर्क येत असे. त्यामुळे विनय कोरे हे शिवसेना किंवा भाजपात उघड प्रवेश करणार काय ? यांची चर्चा सातत्याने होत असे. आणि महाराष्ट्राच्या अनेक सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या नेत्यांनी उघड-उघड शिवसेनेत-भाजपात प्रवेश केला. त्यामध्ये प्रामुख्याने प्रवरानगर म्हणजे 'सहकाराची पंढरी', समजले जाणाऱ्या उद्योग समुहाचे नेते बाळसाहेब विखे-पाटील, त्यांचे चिरंजीव राधाकृष्ण विखे-पाटील, जळगांवचे सुरेशदादा जैन, कृष्णा उद्योग समूहाचे जयवंतराव भोसले, पाटणचे शंभुराचे देसाई, अकलूजचे प्रतापसिंह मोहिते-पाटील, कोल्हापूर जिल्ह्यातील विक्रमसिंह घाटगे, अरूण नरके, निवेदिता माने, यांनी शिवसेना-भाजप मध्ये प्रवेश केला. सहकारात काम करत असताना सत्तारूढ पक्षाच्या विरोधी असणे हे अनेक दृष्टीने घातक ठरते, शासनाचे अनुदान वेळेत मिळत नाही, सातत्याने कायद्याचा बडगा दाखविला जातो. तसेच सहकारामध्ये काम करणारे नेते हे सर्वदृष्ट्या स्वच्छ नसतात. (आर्थिक व्यवहाराबाबत, तसेच नोकर भरती इ.) त्यामुळे ते सत्तारूढ पक्षाशी मिळते-जुळते घेतात. अशा पार्श्वभूमीवर विनय कोरे यांनी युतीत

प्रवेश केला नाही. पण विरोधही केला नाही. युतीचे अनेक मंत्र्यांना वारणेच्या कार्यक्रमांना आणले. कारखाना नामविस्तार, तात्यासाहेबांचा पुतळा अनावरण प्रसंगी इ. कार्यक्रमात त्यांनी युतीच्या मंत्र्यांशी सहकाऱ्याची भूमिका घेतली. आणि युती शासनाला विनय कोरे यांच्या सारख्या तरूण सहकाराचे मोठे पाठबळ मागे असणारा नेता हवा होता. युतीला प. महाराष्ट्रात आणि सहकार क्षेत्रात स्वत:चे असे कार्यकर्ते नव्हते. त्यामुळे त्यांनी काँग्रेस पक्षाच्या विचारांशी बांधील असणारे अनेक कार्यकर्ते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. वारणा खोऱ्यातील जनता मात्र काँग्रेस पक्षाला माननारी आहे. काँग्रेस पक्ष तळागाळापर्यंत रूजला आहे. पण काँग्रस पक्षामध्ये पन्हाळा बावड्याचे आ. यशवंत एकनाथ पाटील असल्यामुळे विनय कोरे यांना काँग्रेस पक्षात लगेच मानाचे स्थान मिळणार नव्हते, अशा परिस्थितीत त्यांनी सर्वांशी सामावून घेण्याचा प्रयत्न केला.

विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली वारणा विविध उद्योग समूहाच्या सर्व संस्थांच्या १९९५ नंतरच्या निवडणूकांत त्यांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. वारणा समूहाच्या सर्व संस्थांच्या सभासदांनी विनय कोरे यांचे नेतृत्त्व मान्य केले होते. तात्यासाहेबांचा जो सहकाराचा आदर्श होता तो चालवण्याचे काम त्यांनी केले होते. म्हणून १९९४ व १९९९ ची साखर कारखान्याची निवडणूक विनय कोरे यांचे पॅनेल प्रचंड बहुमताने निवडून आले. त्याशिवाय इतर संस्थांतही विनय कोरे यांच्या नेतृत्त्वावर पूर्ण विश्वास व्यक्त केला. म्हणून १९९७ ची वारणा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली. वारणा दूध संघ, वारणा बझार, फळप्रक्रिया (वॅप्कॉस) अशा सर्व संस्थांच्या निवडणूका बिनविरोध होऊन त्यांचे सहकारातील नेतृत्त्व मान्य झाले होते. अर्थात तात्यासाहेबांचा वारसा त्यांच्यामागे होता, म्हणूनच हे शक्य झाले. या सहकार क्षेत्रातील पाठिंब्यावर त्यांना राजकारणातही वर्चस्व मिळवायचे होते. म्हणून त्यांनी १९९५ च्या विधानसभेनंतर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. आणि त्यांना त्यात यशही येत गेले. विनय कोरे यांना राजकारणात यश मिळण्याचे कारण म्हणजे वारणा विविध उद्योगांच्या माध्यमातून त्यांच्या

मागे असणारी ताकद, आणि दुसरे म्हणजे आमदार यशवंत एकनाथ पाटील यांच्या २२ वर्ष राजकीय कारकिर्दीत कोणतेही मोठे सार्वजनिक काम झाले नव्हते. त्यामुळे लोकांना बदल हवा होता. आणि विनय कोरे यांच्या रूपाने एक नवे पर्यायी नेतृत्त्व पन्हाळा-बावड्याच्या जनतेला मिळाले होते. एकच व्यक्ती राजकारणात अनेक काळ राहिल्यानंतर त्या व्यक्तीबद्दल थोडीशी नाराजी होते. "कारण राजकारणात कोणताही नेता सर्वांना खूश करू शकत नाही, सर्वांचीच कामे होत नाहीत. त्यामुळे जनता पर्याय शोधण्याच्या मार्गात असते, आणि पर्यायी नेतृत्त्व मिळाल्यास जनता बदल घडवून आणू शकते."[२४]

मार्च १९९७ मध्ये झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांत विनय कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली पन्हाळा पंचायत समिती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी कोरे गट स्थापन केला. तर त्यांच्या विरोधात काँग्रेस पक्षाचे नेतृत्त्व आमदार यशवंत पाटील यांनी केले. १९९७ च्या अगोदर सातत्याने आमदार पाटील गटाची सत्ता पन्हाळा पंयायत समितीवर होती. प्रथमच १९९७ च्या निवडणूकीत आमदार पाटील यांच्या नेतृत्त्वाला आव्हान दिले. ही निवडणूक म्हणजे पुढील विधानसभा निवडणूकीची रंगीत तालीम होती. त्यामुळे दोन्ही गटाने आपल्याच ताब्यात पंचायत समिती ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. संपूर्ण ग्रामीण भाग दोन्ही नेत्यांनी पिंजून काढला, सध्याच्या काळात निवडणूका जिंकण्यासाठी आर्थिक साधन फार महत्त्वाचे ठरते म्हणून दोन्ही गटाकडून त्यांचा मुक्त वापर केला. शेवटी आमदार पाटील यांची अनेक वर्षाची सत्त जावून विनय कारे यांची पन्हाळा पंचायत समितीवर सत्ता आली, आणि आनंदीबाई पाटील ह्या सभापती झाल्या. पाटील गटाला जबरदस्त धक्का दिला. पण आमदार पाटील यांचे चिरंजीव अमर यशवंत पाटील हे सातवे जिल्हा परिषद मतदार संघातून उभे होते. त्यांचा पराभव करण्यासाठी विनय कोरे यांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली. परंतु त्यात त्यांना यश आले नाही, अमर पाटील यांनी पुढे कोल्हापूर जिल्हा परिषदेत शिक्षण

सभापती म्हणून निवड झाली. पण ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असणारी पंचायत समिती मात्र आपल्या ताब्यात घेण्यात कोरे यशस्वी झाले.

पन्हाळा तालुक्यातील म्हणजे पन्हाळा-बावडा विधानसभा मतदार संघात प्रत्येक गावामध्ये कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली कार्यकर्त्यांचा संच तयार झाला. प्रत्येक गावामध्ये कोरेगट विरूद्ध आमदार पाटील गट असे प्रत्येक निवडणूकीच्या निमित्ताने एकमेकांविरूद्ध उभे राहिले, ग्रामपंचायत, सेवासोसायट्या, दूध संस्था, इत्यादी ठिकाणी दोन्ही गटाचे नेते प्रत्येक संस्था आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करू लागले. अनेक कार्यकर्ते आपल्या गटाकडे ओढण्याचा प्रयत्न होऊ लागला. ऑक्टोबर १९९७ मध्ये ग्रामपंचायतीच्या ज्या निवडणूका झाल्या त्यात सावकर गट विरूद्ध आमदार गट असे सर्वत्र चित्र पहायला मिळाले. अनेक ग्रामपंचायत आपल्या ताब्यात घेण्यात विनय कोरे यशस्वी झाले. सेवासोसायट्याही काही प्रमाणात आपल्या ताब्यात घेतल्या. त्यामुळे विनय कोरे हे आमदार पाटील यांना विधानसभेच्या निवडणूकीत सहजासहजी विजय मिळवून देणार नाहीत; असे सर्वत्र चित्र स्पष्ट निर्माण झाले. कारखाना, दूध संघ, बँक, इत्यांदींच्या माध्यमातून विनय कोरे यांनी संपूर्ण भागात सातत्याने संपर्क ठेवला. वास्तविक वारणा उद्योग समूहाचे कार्यक्षेत्र हे पन्हाळा, हातकणंगले, करवीर, वाळवा, शिराळा अशा पाच तालुक्यात पसरले आहे. पण विनय कोरे यांनी पन्हाळा तालुंक्यावर आपले लक्ष केंद्रीत केले होते. सातत्याने कार्यकर्त्यांना संपर्कात ठेवू लागले. ही सर्व हालचाल विधानसभेच्या निवडणूकीच्या दृष्टीनेच होती.

**महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी :-**

१९९५ पासून महाराष्ट्रात शिवसेना-भाजपची सत्ता होती, व काँग्रेस विरोधात होते. विनय कोरे यांना आपल्या पक्षात खेचण्यासाठी शिवसेना भाजपाने अनेक प्रयत्न केले. पण कोरे यांनी कोणत्याही पक्षात उघड प्रवेश केला नाही. १९९५ ते मे

१९९९ पर्यंत ते अपक्षाचीची भूमिका घेवुन होते. पण मे १९९९ मध्ये शरद पवार यांनी सोनिया गांधी यांच्याविरूद्ध बंड पुकारले. स्वदेशी मुद्दा पुढे केला. स्वदेशीच व्यक्तीला देशातील उच्च पद भोगण्याचा अधिकार आहे असा मुद्दा उपस्थित केला; त्यामुळे कॉंग्रेस पक्षाने शरद पवारांच्या भूमिकेला विरोध केला. आणि त्यांना पक्षातून बाहेर काढले. (शरद पवार स्वत:च बाहेर पडले.) त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळी कलाटणी मिळाली. शरद पवार यांनी १० जून १९९९ रोजी मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर मेळावा घेवुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये दक्षिण महाराष्ट्रातील विशेषत: साखर पट्टयातील बऱ्याच नेत्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला. संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रामुख्याने सहकार चळवळीतील नेत्यांनी प्रवेश केला. महाराष्टातील विधानसभा निवडणूका तोंडावर आल्या होत्या. केंद्रातील भाजपा सरकार एक मताने पराभूत झाले होते. त्यामुळे लोकसभेच्या निवडणूका सप्टेंबर महिन्यात घेण्याचा आदेश निवडणूक आयुक्तांनी दिला होता.

केंद्रातील म्हणजे लोकसभेच्या निवडणूका सप्टेंबर महिन्यात होणार होत्या. महाराष्ट्राच्या विधानसभेची मुदत मार्च २००० पर्यंत होती. पण शिवसेना-भाजपानेही महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूका केंद्रातील निवडणूका बरोबरच घेण्याचे ठरविले. त्यामुळे सहा महिने अगोदर महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूका घेतल्या. शिवसेना-भापजा यांची युती, कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस व डावे राजकीय पक्ष, रिपब्लीक पक्ष हे महाराष्ट्राच्या राजकारणात विधानसभा १९९९ च्या निवडणूका लढविण्यास पुढे आले. शिवसेना-भाजपा युती, कॉंग्रेस व रिपब्लीकनचे आंबडेकर, गवई यांची युती तर राष्ट्रवादी-जनता दल, शेकाप, समाजवादी पक्ष, आठवले गट यांची एक युती अशा तिरंग लढती महाराष्ट्रात झाल्या. कॉंग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यामुळे अनेक

दिवस तटस्थ असणारे वारणा विविध उद्योग समूहाचे नेते मा. विनय कोरे कोणत्या पक्षात प्रवेश करणार याबद्दल उत्सुकता लागली होती.

सहकार क्षेत्रात शरद पवार यांची शक्ती मोठी आहे, हे विनय कोरे यांनी ओळखले कारण साखर महासंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात गेला होता, तसेच महाराष्ट्राच्या राजकारणाची आर्थिक नाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिखर बँकेचे (महाराष्ट्र राज्य बँक) अध्यक्ष हे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांचे पुतणे अजितदादा पवार हे होते, शिवाय सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर पुणे या जिल्ह्यातील जनता शरद पवार यांचे नेतृत्त्व मानणारी आहे. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विनय कोरे यांचे विरोधक आमदार यशवंत एकनाथ पाटील हे मूळ काँग्रेस पक्षात राहिले, त्यामुळे विनय कोरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जवळ गेले. सप्टेंबर १९९९ मध्ये महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा यांच्या संयुक्त निवडणुका होणार होत्या. विनय कोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रत्यक्ष उमेदवारी घेतली नाही, पण 'राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत' उमेदवार म्हणून पन्हाळा-बावडा मतदार संघातून अर्ज केला. विनय कोरे यांच्यासारखा सहकारातील बलाढ्य ताकद मागे असणारा उमेदवार कोणत्याही पक्षाला हवाच होता. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही कोणतीही अट न घालता पुरस्कृत उमेदवार म्हणून त्यांना मान्यता दिली. राष्ट्रवादी पुरस्कृत उमेदवार म्हणून उभे राहण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात कोणताच पक्ष स्वत:च्या ताकदीवर संपूर्ण बहुमत घेईल असे वातातवरण नव्हते, शिवाय कोणत्याही पक्षाला न मानणारी माणसे पण वारणा उद्योगावर प्रेम करणारी होती. म्हणून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत उमेदवार म्हणून उभे राहिले.

त्यांच्या विरोधात काँग्रेस पक्षाचे यशवंत एकनाथ पाटील तर शिवसेनेच अशोक शंकर पाटील हे उमेदवार होते. शिवसेनेचे अशोक पाटील यांनी १९९०, १९९५, १९९९ च्या विधानसभा निवडणूका लढवल्या पण त्यात त्यांना यश आले नाही. १९९५

च्या निवडणूकीची तुलना करता सर्वसाधारण तेच उमेदवार होते फक्त निपुन कोरे यांच्या जागी विनय कोरे होते. आणि सर्व उमेदवारी 'कोडोली' या गावचेच होते. तिन्ही प्रमुख उमेदवार कोडोलीतील असल्यामुळे शिवाय संपूर्ण मतदारसंघात कोडोली हेच गांव लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे असल्यामुळे कोडोली हेच निवडणूकीचे मुख्य कार्यालय होते. संपूर्ण मतदारसंघात आरोप प्रत्यारोप, सभा मेळावे झाले. विनय कोरे यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली. आणि शेवटी मतदान होवुन "७ ऑक्टोबरला निवडणूकीचा निकाल जाहीर झाला. या पन्हाळा-बावडा मतदार संघातून विनय कोरे (सावकर) हे १८,७१४ मताधिक्य घेऊन विजयी झाले. विनय कोरे यांना एकूण मतदान ५८,३२२ इतके मिळाले. काँग्रेस पक्षाचे यशवंत पाटील यांना ४०,६०८ तर शिवसेनेचे अशोक पाटील यांना १०,४८४ इतके मतदान झाले आणि विनय कोरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत उमेदवार विजयी झाले."[२५]

विनय कोरे यांचा विजय हा तात्यासाहेब कोरे यांनी स्थापन केलेल्या वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाला जातो. कारण या उद्योग समूहाच्या जोरावरच त्यांना संपूर्ण मतदार संघात आपला गट स्थापन करता आला. तात्यासाहेब कोरे हे १९५४ साली साखर कारखान्याचे शेअर्स (भाग खरेदीसाठी) संपूर्ण वारणा परिसरात साखरे महाराजांची दिंडी काढून फिरत होते तेंव्हा ते सांगत होते की, कारखान्यामुळे संपूर्ण वारणा परिसराचे कोट कल्याण होणार आहे. म्हणून कारखान्याचा शेअर्स घ्या असा शेतकऱ्यांना सल्ला देत होते. या कारखान्यामुळेच वारणा परिसराचा आज विकास झाला. या विकासामुळेच विनय कोरे यांच्या विजयाचे नेतृत्त्व पुढे आले, आणि ते आमदार झाले. विनय कोरे यांच्या विजयाचे खरे शिल्पकार हे तात्यासाहेब कोरे आणि संपूर्ण वारणा उद्योग समूह आहे.

विनय कोरे १८,७१४ इतक्या मताधिक्क्याने विजयी झाले. विधानसभेचा पन्हाळा-बावडा हा मतदारसंघ इचलकरंजी लोकसभा मतदार संघात येतो. इचलकरंजी लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या निवेदिता माने या अधिकृत उमेदवार होत्या. इचलकरंजी लोकसभा मतदारसंघात विधानसभेचे सहा मतदारसंघ येतात. या सहा पैकी पाच विधानसभा मतदार संघातून शाहूवाडी, वडगांव, इचलकरंजी, शिरोळ आणि राधानगरी-भुदरगड यातून कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार विजयी झाले. पण पन्हाळा-बावडा मतदार संघातून राष्ट्रवादी पुरस्कृत उमेदवार विनय कोरे विजयी झाले. निवेदिता माने यांना पन्हाळा-बावडा मतदारसंघातील मताधिक्क्याच्या जोरावरच खासदार झाल्या. विनय कोरे यांच्या उमेदवारीमुळे लोकसभेची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला जागा मिळाली. १९९६ आणि १९९८ या दोन वेळेच्या पराभवाचा वचपा १९९९ च्या निवडणूकीत निवेदिता माने यांनी काढला.

विनय कोरे हे सहकार आणि राजकारण या दोनही क्षेत्रात अगदी लहान वयात यशस्वी झाले. ज्या व्यक्तींच्या ताब्यात सहकारी संस्था आहेत त्यांचे राजकारणावर वर्चस्व प्राप्त झाले होते. हे महाराष्ट्रात अनेकवेळा सिद्ध झाले आहे. तेच वारणानगरमध्ये झाले. सहकाराच्या माध्यमातूनच त्यांना राजकारणावर आपली पकड ठेवता आली. त्यांनतर जून २००० मध्ये काही ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या. पण पन्हाळा-बावडा मतदार संघातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून जिचा उल्लेख केला जातो. त्या कोडोली ग्रामपंचायतीवर कोरे गटाची सत्ता आली नाही. तेथे पाटील गटच यशस्वी झाला. विधानसभेच्या निवडणूकीनंतर विनय कोरे हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात पूर्णपणे सामिल झाले आहेत.

अगदी अलिकंडे म्हणजे मार्च २००१ मध्ये संपूर्ण राज्यात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक गाजली. कॉंग्रेस विरूद्ध राष्ट्रवादी पक्षात ही निवडणूक

झाली. काँग्रेस पक्षाचे नेतृत्त्व आमदार महादेवराव महाडीक तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्त्व खासदार सदाशिवराव मंडलीक यांनी केले. पन्हाळा तालुका सेवासोसायटी गटातून विनय कोरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते तर संदीप नरके हे काँग्रेसचे पक्षाचे होते. कोरे-नरके ही लढत जिल्ह्यात गाजली. अनेक वर्षे अरूण नरके हे सेवा सोसायट्या गटातून जिल्हा मध्यवर्ती बँकेला पन्हाळा तालुक्याचे नेतृत्त्व करतात. सेवा सोसायट्या गटात नरके व माजी आमदार पाटील यांचे अनेक वर्षापासूनचे वर्चस्व आहे. पण प्रथमच २००१ च्या निवडणूकीत कोरे यांनी त्यांच्या पुढे आव्हान निर्माण केलें. पण या निवडणूक विनय कोरे हे केवळ सहा मतांनी पराभूत झाले. पण आजपर्यंतची सेवा-सोसायट्या गटातून नरके हे एकतर्फ निवडून येत होते. विनय कोरे यांनी ही निवडणूक एकतर्फी होवुन न देता तुल्यबळ केली.

विनय कोरे हे सहकारात तात्यांचा आदर्श घेऊन काम करू लागले, सहकारातील त्यांच्या कामाबद्दल त्यांना पुरस्कार मिळाले आहेत, शिवाय इचलकरंजी येथील राष्ट्रीय पातळीवरचा १९९८ साली 'फाय फौंडेशनचा' पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार १९९१ साली, वारणा परिसरात वारणा कारखान्याच्या माध्यमातून कृषि, औद्योगिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आजवरच्या कार्याबद्दल पुरस्कार मिळाला होता. तोच वारसा विनय कोरे यांनी पुढे चालवला. एकाच संस्थेकडून असा पुरस्कार मिळण्याचा योगायोग मानावा लागेल.

## संदर्भ

१) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. १३३.

२) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. १२५.

३) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. १३९.

४) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यद्विपूर्ती समारंभ समिती, १ डिसेंबर, १९७४", पृष्ठ क्र. २६९.

५) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ समिती", मे १९९०, पृष्ठ क्र. २३८.

६) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ समिती", मे १९९०, पृष्ठ क्र. २४१.

७) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ समिती", मे १९९०, पृष्ठ क्र. २४३.

८) "मी एक कार्यकर्ता : वि. आ. तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समारंभ समिती", मे १९९०, पृष्ठ क्र. ११०.

९) "दै. केसरी", ५ एप्रिल २००१, पृष्ठ क्र.३.

१०) "३८ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४ वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर", पृष्ठ क्र. १.

११) "३८ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४ वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर", पृष्ठ क्र. २.

१२) "३८ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४ वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर", पृष्ठ क्र. २.

१३) "४० वा वार्षिक अहवाल, १९९५-९६ तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. १.

१४) "४० वा वार्षिक अहवाल, १९९५-९६ तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. ६.

१५) "४० वा वार्षिक अहवाल, १९९५-९६ तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. ६.

१६) "चित्रलेखा", २९ डिसेंबर १९९७, पृष्ठ क्र.३.

१७) "दै. पुढारी", १ डिसेंबर १९९८, पृष्ठ क्र.३.

१८) "४२ वा वार्षिक अहवाल तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. ८.

१९) "दै. पुढारी", २ डिसेंबर १९९८, पृष्ठ क्र.२.

२०) "दै. पुढारी", २४ एप्रिल १९९९, पृष्ठ क्र.३.

२१) "४२ वा वार्षिक अहवाल तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. ८.

२२) "दै. पुढारी", १० ऑगस्ट १९९८, पृष्ठ क्र.३.

२३) "४३ वा वार्षिक अहवाल तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर", पृष्ठ क्र. ९.

२४) "प्रा. डॉ. सुभाष पाटील - कारखान्याच्या निवडणूका शोध व बोध, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद ८ वे अधिवेशन", पृष्ठ क्र.६१.

२५) "दै. तरूण भारत", ८ ऑक्टोबर १९९९, पृष्ठ क्र.१२.

****